बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार,दि.९ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

# भारतासोबत कोण-कोणते देश?
## चीन,तुर्की वगळता इतर देशांचा भारताला पाठिंबा: अमेरिकेची तळातमळ्यात प्रतिक्रिया

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:मंगळवारी रात्री उशिरा पाकिस्तानमध्ये हवाई हल्ला करून भारताने दहशतवाद्यांचे तळ उद्धवस्त केले. ही बातमी समोर येताच जगभरात खळबळ उडाली. चीन आणि तुर्की उघडपणे पाकिस्तानच्या समर्थनार्थ समोर आले. तर इस्त्रायलने भारताला पूर्ण ताकदीने पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे.

अमेरिकेचे विधान संमिश्र होते. त्याच वेळी, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की भारताचा हल्ला दुर्दैवी आहे. दोन्ही शेजारी देशांमधील वाढत्या तणावामुळे चीन चिंतेत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की दोन्ही देशांनी संयम बाळगावा आणि परिस्थिती आणखी बिकट होईल अशी कोणतीही पावले उचलणे टाळावे. माजी ब्रिटिश पंतप्रधान ऋषी सुनक यांनी भारताचे समर्थन करताना लिहिले की, कोणत्याही देशाने दुस-या देशाच्या भूमीवरून स्वत:च्या भूमीवर हल्ले स्वीकारू नयेत. भारताने दहशतवाद्यांच्या अड्डयांवर केलेला हल्ला योग्य आहे. आम्ही दहशतवाद्यांना कोणत्याही प्रकारची सवलत देऊ शकत नाही.



### भारताला स्वसंरक्षणाचा अधिकार: इस्त्रायल
ऑपरेशन सिंदूरनंतर भारतातील इस्रायली राजदूत रुवेन अझर यांनी भारताला पाठिंबा दिला आहे. ते म्हणाले की इस्त्रायल भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराचे पूर्ण समर्थन करतो. दहशतवाद्यांना हे माहित असले पाहिजे की निष्पाप लोकांविरुद्ध त्यांनी केलेले भयंकर गुन्हे त्यांना लपण्यासाठी जागा सोडणार नाहीत.

### लढाईत फ्रान्स भारतासोबत
भारतातील फ्रेंच वर लिहिले दहशतवादाविरुद्धच्या लढाईत आम्ही भारताला पाठिंबा देतो. भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या घडामोडींबद्दल आम्हाला खूप चिंता आहे. आम्ही तणाव कमी करण्याची आणि नागरिकांच्या संरक्षणाची मागणी करतो.

### परिस्थितीवर लक्ष ठेवून : अमेरिका
अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी एक्स वर पोस्ट केले आहे की ते भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी भारत आणि पाकिस्तानसोबत चर्चा सुरूच राहील, असे रुबियो यांनी म्हटले आहे.

### दोघांनी संयम बाळगावा:इजिप्त
भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या घडामोडींबद्दल आम्हाला खूप चिंता आहे. आम्ही दोन्ही पक्षांना संयम बाळगण्याचे आणि राजनैतिक मार्गाने संवाद सुरू ठेवण्याचे आवाहन करतो. इजिप्तचे परराष्ट्र मंत्रालय संकट कमी करण्यासाठी आणि ते आणखी वाढण्यापासून रोखण्यासाठी प्रयत्न करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

### दोघांनी शांततेने मार्ग काढावा : इराण
भारत आणि पाकिस्तानमधील तणावावर इराणने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकीई यांनी दोन्ही बाजूंना संयम बाळगण्याचे आवाहन केले. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची आज भारतीय परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची भेट घेऊ शकतात.

### पाकच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन:तुर्की
तुर्की राजदूतांनी परराष्ट्र मंत्री इशाक दार यांची भेट घेतली आणि पाकिस्तानसोबत एकता व्यक्त केली. तुर्कीच्या राजदूताने हे पाकिस्तानच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन मानले आणि निष्पाप लोकांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला.

### भारताची कारवाई खेदजनक : चीन
७ मे रोजी भारताने पाकिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्याबद्दल चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, भारताची लष्करी कारवाई दुर्दैवी आहे. आम्हाला सध्याच्या परिस्थितीबद्दल काळजी वाटते.

### तणाव कमी करावा:कतार
कतारने ऑपरेशन व्हर्मिलियनवर संतुलित आणि राजनैतिक भूमिका स्वीकारली. भारत आणि पाकिस्तानमधील तणावावर कतारने चिंता व्यक्त केली आहे आणि हे प्रकरण राजनैतिक पद्धतीने सोडवले पाहिजे असे म्हटले आहे.

### आतंरराष्ट्रीय शांततेला धोका : यूएई
संयुक्त अरब अमिरातीने भारत आणि पाकिस्तानला प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण करणारी परिस्थिती निर्माण करू नका असे आवाहन केले. संयुक्त अरब अमिरातीचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान यांनी हा वाद शांततेने सोडवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे राजनयिकता आणि संवाद साधण्याचे आवाहन केले आहे.

### आम्हाला चिंता : रशिया
रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोवा म्हणाल्या की भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी संघर्ष वाढल्याबद्दल आम्हाला खूप चिंता आहे. या प्रदेशात आणखी वाढ होऊ नये म्हणून आम्ही दोन्ही पक्षांना संयम बाळगण्याचे आवाहन करतो.

### नागरिकांची सुरक्षा महत्वाची : ब्रिटन
भारत आणि पाकिस्तानमधील वाढता तणाव हा ब्रिटनमधील अनेक लोकांसाठी गंभीर चिंतेचा विषय असेल असे ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनी म्हटले आहे. आम्ही दोन्ही देशांशी आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांशी चर्चा करत आहोत. आम्हाला वाटाघाटी पुढे जाव्यात, तणाव कमी व्हावा आणि नागरिकांची सुरक्षा राखावी अशी आमची इच्छा आहे.

## राज्यात ६० हजार अनधिकृत स्कूल बस
धक्कादायक: स्कूल बसच्या नियमावलीत सुधारणा



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यात सध्या अधिकृतपणे ४० हजार स्कूल बसेस रस्त्यावर धावत असून दुसरीकडे सुमारे ५० ते ६० हजार बसेस अनधिकृतपणे धोकादायक पद्धतीने विद्यार्थ्यांची शाळेतून ने-आण करीत असल्याची तक्रार स्कूल बस चालक-मालक संघटनेच्या पदाधिका-यांनीच केली आहे. या पार्श्वभूमिवर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देत लवकरच स्कूल बसेसच्या नियमावलीत सुधारणा करणार असल्याची माहिती देतानाच अनधिकृतपणे विद्यार्थ्यांची वाहतूक करणा-या बसेसवर कारवाई करण्याचे आदेश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. पान २ वर

### तर अधिकाऱ्यांवरही होणार कारवाई
अनधिकृतपणे विद्यार्थ्यांची ने-आण करताना कारवाई केलेल्या स्कूल बसेसना पुढील ३ महिन्यांत दंडात्मक रक्कम भरून त्या बसेस अधिकृत करून घेण्याची संधी मंत्री सरनाईक यांनी बस मालकांना दिली आहे मात्र, ३ महिन्यांनंतर ज्या प्रादेशिक परिवहन विभागांमध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत स्कूल बसेस आढळल्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिका-यांनाही कठोर कारवाईला समोर जावे लागणार असल्याचा इशारा सरनाईक यांनी या वेळी दिला.

## निकाल जाहीर,पडताळणी झाली पण नियुक्ती मिळेना!
आक्रमक:झेडपी समोर आरोग्य सेवकांचे आमरण उपोषण

पुण्यभूमी प्रतिनिधी




बीड: आरोग्य सेवकांना नियुक्ती देण्यात यावी यासाठी बीड जिल्हा परिषद समोर गुरुवार दिनांक ८ मे पासून आरोग्य सेवक ५० टक्के पुरुष उमेदवार आमरण उपोषणास बसले आहेत जोपर्यंत नियुक्तया दिल्या जात नाहीत तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील असा आक्रमक पवित्रा निवड झालेल्या उमेदवारांनी घेतला असून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात न्यायाची मागणी केली आहे.निवेदनात म्हंटले आहे की,जिल्हा

## परळी-गंगाखेड महामार्ग रखडलेलाच!
ॲड.मनोज संकाये : जनआंदोलन उभा करणार



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम पूर्ण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी प्रशासनाकडे केली होती. १ मे रोजी प्रशासनाला रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु उपजिल्हाधिकारी माननीय अरविंद लाटकर साहेब तसेच परळी पोलीस स्टेशनचे पीआय डोने साहेब यांनी संबंधित अधिकाऱ्यां सोबत दूरध्वनी वरून चर्चा केली परंतु त्या चर्चेचा काही उपयोग झाल्याचे दिसून येत नाही. अधिकारी इतके मग्रूरपणे वागत आहेत की त्यांना प्रशासनातील अधिकारी सांगून सुद्धा त्यांना फरक पडत नाही त्यामुळे आता एक तर काम पान २ वर

## पोहण्यास गेलेल्या मुलाचा बूडून मृत्यू
दुर्घटना:नागापूरच्या वाण धरणातील घटना

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:उन्हाची तीव्रता वाढली असल्याने अनेकजण विहिरी,तलावत पोहण्याचा आनंद लुटतात परंतु हा आनंद कधी कधी जिवघेणा ठरतो , नागापूर च्या वाण धरणात पोहण्यास गेलेल्या एका मुलाला आपला प्राण गमवावा लागला आहे . या विषयी सविस्तर वृत्त असे कि, शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या नागापूर येथील वाण धरणात पोहण्यासाठी गेलेल्या मुलाचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना बुधवार दि ७ रोजी घडली. घटनेची माहिती मिळताच परळी नगर परिषदेच्या आपत्ती विभाहाचे प्रमुख सुनील आडोदे आणि त्याच्या सहकार्यांनी घटनास्थळी दाखल होत शोध कार्य करून मयत मुलास बाहेर काढले.

मिळालेल्या माहितीनुसार परळी शहरातील बरकत नगर येथील शेख मुजमिल शेख खय्युम (वय १७) मुलगा बुधवार दि ७ रोजी सकाळी ११ च्या सुमारास पोहण्यासाठी पान २ वर

भानुदास माळी | बीडमध्ये काँग्रेसची पत्रकार परिषद

## जातीनिहाय जनगणनेवर विश्वास नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली असली तरी ही ही जनगणना करण्यासाठी पंचवीस हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली नसल्याने ही जनगणना होईल की नाही याच्याबाबत शंका असल्याचे काँग्रेसच्या ओबीसी विभागाचे प्रदेश अध्यक्ष भानुदास माळी यांनी आज दिनांक आठ रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी परिषदेस ओबीसी विभागाचे काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी सांगितले केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याचे श्रेय काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांना जाते त्यांनीच जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी लावून ठरली होती याबाबत राष्ट्रीय पातळीवर आंदोलन व जनजागृती केली होती



केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली असली तरी या जातीनिहाय जनगणनासाठी पंचवीस हजार कोटीची रुपयाची तरतूद करावी लागणार आहे ती केंद्र सरकारने केलेली नाही त्यामुळे केंद्रातील सरकार जातीनिहाय करणार की नाही आणि केली तर कुठल्या एजन्सी मार्फत करणार असा प्रश्न उपस्थित केलामाननीय प्रसिद्ध करून जातीने गणनेसाठी ज्या राहुल गांधीने लोकसभेत आक्रमक पवित्र घेऊन सरकारला जातीनिहाय गणना करण्यात भाग पडले त्या काँग्रेस चे नेते राहुल गांधी यांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या वतीने येत्या जून महिन्यात छत्रपती संभाजीनगर येथे ओबीसी मेळावा व खासदार राहुल गांधी यांचा नागरी सत्कार आयोजन करण्यात आले आहे यावेळी पत्रकार परिषदेत उपस्थित काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे राजेंद्र राख ,कांचकुमार चाटे ,नवनाथ बापू थोटे ,वसंत मुंडे , प्रवीणकुमार शेप ,बीड जिल्हा अध्यक्ष ओबीसी विभाग संभाजी जाधव, रमेश सानप ,गणेश बजगुडे, प्रवेश कुरेशी ,गणेश जावकर, गणेश राऊत, पान २ वर

## पिंपरी घाटमध्ये भोजनातून विषबाधा!
घटना: ५० जणांवर उपचार सुरू



पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई: तालुक्यातील पिंपरी (घाट) गावात नगर भोजनाच्या कार्यक्रमानंतर सुमारे ५० जणांना विषबाधा झाली असून त्यांना तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच आ. धनंजय मुंडे यांनी दवाखान्यात फोन करुन चौकशी करुन, वैद्यकीय सेवा देण्याची सूचना केली.

प्राथमिक माहितीनुसार, बुधवारी रात्री गावात नगर भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर पहाटेपासून अनेकांना उलट्या, मळमळ, पोटदुखी अशा तक्रारी जाणवू लागल्या. यानंतर ग्रामस्थांना घेऊन सरपंच काशिनाथ कातकडे यांनी त्वरित स्वाराती रुग्णालयाकडे धाव पान २ वर

## योग्य माहिती महत्त्वाची!

ऑपरेशन सिंदूर’ या अत्यंत महत्त्वाच्या लष्करी कारवाईबाबत घेतलेली संयुक्त पत्रकार परिषद ही देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसेच माहितीच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल ठरली आहे. या परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री, हवाई दलातील अधिकारी व्योमिका सिंह आणि लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी उपस्थित राहून जनतेसमोर अधिकृत माहिती मांडली. हे तिघेही आपापल्या क्षेत्रातील अत्यंत अनुभवी अधिकारी असून, त्यांनी संयमित आणि स्पष्ट भाषेत ऑपरेशनच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल माहिती दिली.अशा संवेदनशील घडामोडीच्या वेळी सरकार आणि लष्कराकडून थेट संवाद साधणे हे लोकशाहीचे बलस्थान आहे. अफवांना आळा घालण्यासाठी आणि जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी ही पत्रकार परिषद महत्त्वाची ठरली. माध्यमांनीही ही जबाबदारी लक्षात घेऊन अधिकृत सूत्रांवर आधारित आणि संवेदनशीलतेची जाण ठेवून बातम्या द्याव्यात, अशी अपेक्षा आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’ हे पहलगाममध्ये झालेल्या आपल्या निष्पाप बांधवांच्या क्रूर हत्येला भारताने पाकला एक प्रकारे प्रत्युत्तर दिले आहे. भारताने पाकिस्तानच्या सेना व सामान्य नागरिकांवर हल्ला न करता फक्त अतिरेकी तळ नष्ट केल्याने जगातून या कारवाईला पाठिंबा मिळत आहे. दहशतवाद्यांना भारतात येण्यापासून रोखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. जगातल्या अतिरेक्यांना व जिहादींना आपला विचार बदलायला लावणारी ही कारवाई भारताने केली आहे. यापूर्वी भारताने अशाच दहशतवाद्यांच्या विरोधात कारवाया केल्या आहेत.

तरीसुद्धा पाकिस्तान व दहशतवादी यांच्यावर कोणताच परिणाम झालेला दिसत नाही. त्यामुळेच भारताला अशा मोठ्या कारवाया कराव्या लागल्या. जगातील अनेक देश भारतासोबत उभे राहिल्याने पाकिस्तान पाठिंब्यासाठी धडपडत आहे. पाकिस्तानवर या कारवाईचा काहीच परिणाम न झाल्यास त्यांना भविष्यात आणखी मोठ्या कारवायांना सामोरे जावे लागेल. मंगळवारी रात्री उशिरा भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी छावण्यांवर ‘ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत हवाई हल्ले केले. या कारवाईत दहशतवादी तळांचे भारी नुकसान करण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारताचे हे निर्णायक प्रत्युत्तर होते. सुरक्षा दलाने हे सर्जिकल ऑपरेशन अतिशय काळजीपूर्वक आणि अचूक नियोजनासह पार पाडले. भारताच्या या कृतीमुळे दहशतवादाविरुद्धची कठोर भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांतील तणाव वाढण्याची शक्यता असून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याचे पडसाद उमटणार यात शंका नाही. लष्कराच्या अभिमानास्पद कामगिरीबद्दल त्याचे कौतुक करावे तितके थोडे आहे. भारताच्या संरक्षण क्षमतेचा झंझावात पुन्हा एकदा जगासमोर स्पष्ट झाला आहे.

‘ऑपरेशन सिंदूर’ ही कारवाई केवळ एक लष्करी कृती नव्हे, तर भारताच्या दृढ इच्छाशक्तीची आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील सजगतेची ठोस ओळख आहे. या ऑपरेशनने पाकिस्तानला न केवळ अद्दल घडवली तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताच्या निर्णायक नेतृत्वाची छाप उमटवली. पाकिस्तानने गत काही वर्षांत सातत्याने भारतविरोधी कारवायांमध्ये सहभाग घेतला आहे. सीमारेषेवर घुसखोरी, दहशतवादाला खतपाणी घालणे आणि शस्त्रसज्ज कट रचणे हे सारे प्रकार वारंवार भारताच्या संयमाची परीक्षा घेत होते. मात्र ‘ऑपरेशन सिंदूर’ने अशा कुकर्मांना सडेतोड उत्तर दिले आहे. या ऑपरेशनची अचूक योजना, गुप्तचर विभागांची कार्यक्षमता आणि लष्कराची धारदार कारवाई या सा–या गोष्टींनी यशाला चार चाँद लावले. हे केवळ शस्त्रबळाचे प्रदर्शन नव्हते तर एक स्पष्ट संदेश होता. भारत आपल्या सार्वभौमत्वावर कोणताही आघात सहन करणार नाही! या कारवाईमुळे पाकिस्तानला मोठा मानसिक आणि सामरिक धक्का बसला आहे. त्यांच्या मोहिमांची दिशा भांबावली, भरकटली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांची विश्वासार्हता आणखी ढासळली आहे. या घटनेने इतर देशांनाही भारताच्या सुरक्षाविषयक दृष्टिकोनाची जाणीव करून दिली आहे.

आपल्या सैनिकांचे धैर्य, केंद्र सरकारचे ठाम नेतृत्व आणि जनतेचा लष्करावर असलेला विश्वास हे सारे घटक ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशाचे खरे शिल्पकार आहेत. भारत शांतताप्रिय देश असला तरी त्याच्या संयमाची परीक्षा घेणा–यांना सडेतोड उत्तर द्यायला तो सदैव तयार आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’ हे त्याचेच एक सशक्त उदाहरण आहे. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी ज्याप्रकारे भ्याड आणि अमानुष हल्ला करून निरपराध पर्यटकांची हत्या केली ते पाहता त्याचे प्रत्युत्तर देणे भारताला भाग होते. ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे ते काम चोखपणे पार पाडण्यात आले. भारताच्या हवाई दलाने जैश–ए –मोहम्मद, हिजबूल मुजाहिद्दीन आणि लष्कर–ए–तोयबा या दहशतवादी संघटनांची मुख्यालये आणि प्रशिक्षित केंद्रे उद्ध्वस्त केली. भारतीय भूमीतून पाकिस्तानच्या सीमेत कुठेही दडून बसलेल्या दहशतवाद्यांना लक्ष्य करणे भारतासाठी कठीण नाही हा संदेश या निमित्ताने गेला हे महत्त्वाचे आहे. या हल्ल्यानंतर पाकने सुरू केलेला कांगावा पाहता पाकिस्तान हा किती कर्मदरिद्री देश आहे, हे स्पष्ट करण्याची एकही संधी पाकिस्तानी राज्यकर्ते सोडत नाहीत हे पुन्हा एकदा दिसून आले. खरे तर दहशतवाद पोसणारा पाकिस्तान त्याची विषारी फळे चाखत जगभर बदनाम झाला आहे. सध्या तो पूर्णपणे एकाकी पडला आहे.

# पुणे येथे आदी संस्कृती महोत्सव

## धोरण:कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:युनिव्हर्सल ट्राइब्स आणि दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्री (ऊखउउख) यांच्या संयुक्त विद्यमाने एक भव्य आणि ऐतिहासिक सांस्कृतिक उपक्रम आदी संस्कृती महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव १३ मे ते १७ मे २०२५ या कालावधीत पुणे शहरात गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट पुणे पार पडणार असून, भारतातील पारंपरिक आदिवासी जीवनशैली, कला, संस्कृती, अन्न, संगीत, नृत्य आणि उद्योजकतेचे दर्शन घडवणारा एक अद्वितीय महोत्सव ठरणार आहे.

या महोत्सवाचा उद्देश भारतातील आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वैभवाला एक नवे व्यासपीठ देणे, त्यांच्या कलेला बाजारपेठ मिळवून देणे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. विविध राज्यांतील सुमारे २० हून अधिक आदिवासी जमाती या महोत्सवात सहभागी होणार असून, त्यांच्या अनोख्या परंपरा, आस्थापन, कलेचा आणि कौशल्याचा अनुभव पुणेकर जनतेला घेता येणार आहे. २०० हून स्टॉल ५०० अधिक कलाकार यामध्ये सहभागी होणार आहेत आर्टिस्ट तसेच . या महोत्सवामध्ये विविध आदिवासी कलांच्या कार्यशाळा ही होणार आहेत त्याच बरोबर विविध प्रकारचे कार्यक्रम जसे की उद्योजक्ता विकास, स्टार्ट आप मीट व काही विशेष सतरांचे आयोजन करणार आहेत आहेत .

दररोजचे कार्यक्रम आणि आकर्षणांचे तपशीलवार वर्णन:१३ मे २०२५ – उद्घाटन सत्र :पहिल्या दिवशी महोत्सवाची सुरुवात आदिवासी वाद्यांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषा आणि स्वागत नृत्यांच्या सादरीकरणाने होईल. या कार्यक्रमाचे व प्रदर्शनाचे उद्घाटन हे पद्म श्री डॉ. मिलिंद कांबळे, संस्थापक अध्यक्ष डिककी यांच्या हस्ते होईल. उद्घाटन समारंभात केंद्र व राज्यस्तरीय मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, आदिवासी प्रतिनिधी, उद्योजक आणि ऊखउउख व णपर्ळींशीीरश्र ढीळलशी चे पदाधिकारी उपस्थित राहतील. शेवटच्या दिवशी एकत्रित आदिवासी नृत्य–गायन स्पर्धा, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, तसेच आदिवासी उद्योजकांसाठी पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे.




१४ मे २०२५ – हस्तकला व वनउत्पादने प्रदर्शन:

या दिवशी विविध राज्यांतील आदिवासी हस्तकला व शिल्पकलेचे प्रदर्शन होईल. बाँबूपासून तयार केलेल्या कलाकृती, ढोकरा धातुकला, गोंद चित्रकला, वारली पेंटिंग, आदिवासी शिल्प हे प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण असतील. या प्रदर्शनात विविध प्रकारच्या विविध अन्न पदार्थाचा आस्वाद घेत येईल

या दिवशी विविध पारंपरिक आदिवासी कलांच्या कार्यशाळा देखील आयोजित करण्यात येणार आहेत. यात वारली चित्रकला, गोंद आणि मंडहुबणी या चित्रकालांचे समावेश असतील. सहभागी नागरिकांना या कार्यशाळांमधून प्रत्यक्ष कलेचा अनुभव घेण्याची संधी मिळेल, तसेच आदिवासी संस्कृतीच्या सौंदर्यशास्त्राचा आणि तंत्रज्ञानाचा परिचय होईल.

१५ मे २०२५ – विशेष मार्गदर्शन व पोडकास्ट सत्र :या दिवशी एक अत्यंत मान्यवर आणि विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास विभागाचे मंत्री, माननीय प्रा. डॉ. अशोक उईके स्वतः उपस्थित राहून सहभागी होणार आहेत. या सत्रात ते आदिवासी समाजाच्या समग्र विकासासाठी सरकारच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देतील, तसेच आदिवासी उद्योजकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी, अपेक्षा व अनुभव समजून घेण्याचा प्रयत्न करतील. हे सत्र आदिवासी तरुण–तरुणींना प्रेरणा देणारे व मार्गदर्शक ठरेल.

याच दिवशी, आजच्या तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय असलेल्या आणि सामाजिक बदलांवर केंद्रित असलेल्या अमुक तमुक या सुप्रसिद्ध पॉडकास्टच्या लाईव्ह रेकॉर्डिंग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या लाईव्ह पॉडकास्टमध्ये आदिवासी उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, आणि पारंपरिक ज्ञान जपणारे मान्यवर सहभागी होणार असून, ते आपल्या अनुभवांद्वारे एक समृद्ध आणि प्रेरणादायी संवाद साकारतील.

१६ मे २०२५ – आदिवासी उद्योजकता :१६ मे २०२५ रोजी सकाळच्या सत्रात आदिवासी उद्योजकतेला चालना देण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे

पहिली कार्यशाळा जर्ीींपळींळशी षी ढीळलरश्र डींरीीं–र्ीि ही नवउदयोन्मुख आदिवासी उद्योजकांसाठी एक मौल्यवान संधी आहे. या सत्रात आदिवासी समुदायासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध अनुदान योजना, सहकार्य कार्यक्रम आणि भांडवली मदतीबाबत सविस्तर माहिती दिली जाईल.

दुसरी कार्यशाळा उहरीं ुळींह उ ही आर्थिक साक्षरतेच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त आहे. या सत्रात एक अनुभवी चार्टर्ड अकाउंटंट (उ) सहभागी होऊन लघु व मध्यम व्यवसायांमध्ये आर्थिक नियोजनाचे महत्त्व, खर्चाचे व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील. सहभागी उद्योजकांना आपले वैयक्तिक प्रश्न थेट विचारण्याची संधी मिळणार असून, कर व्यवस्थापन, व्यवसाय नोंदणी, जीएसटी आणि आयकर विवरणपत्र यांसारख्या बाबी अधिक स्पष्ट होतील. या दोन्ही कार्यशाळा आदिवासी समुदायातील भावी उद्योजकांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरतील, आणि त्यांच्या व्यावसायिक प्रवासाच्या सुरुवातीस एक भक्कम पाया प्रदान करतील.

१७ मे २०२५ – समारोप सत्र :शेवटच्या दिवशी एकत्रित आदिवासी पोषयांखाचे प्रदर्शन आयोजित केले असून समारोप कार्यक्रमात ऊखउउख व णपर्ळींशीीरश्र ढीळलशी चे वरिष्ठ पदाधिकारी, सरकारी प्रतिनिधी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतील.

महोत्सवाचा उद्देश व सामाजिक संदर्भ:आदी संस्कृती महोत्सव २०२५ केवळ एक सांस्कृतिक सोहळा नसून, आदिवासी समाजाला आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या सशक्त बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे. DICCI च्या उद्योगातून सामाजिक उत्थान या संकल्पनेनुसार, आणि णपर्ळींशीीरश्र ढीळलशी च्या आदिवासी स्वयंपूर्णतेचा आत्मा या ध्येयाशी सुसंगत असा हा उपक्रम आहे.या महोत्सवाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या पारंपरिक कौशल्यांना व्यावसायिक रूप देऊन, त्यांना नव्या बाजारपेठांमध्ये सहभागी करून घेण्याची संधी निर्माण होत आहे.

हा महोत्सव सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, उद्योजक, उद्योग संस्था, संशोधक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी खुला आहे.एकत्र येऊन आपण आपल्या मूलगामी आदिवासी परंपरेचा गौरव करूया आणि समावेशक विकासाची दिशा ठरवूया.

यावेळी रमेश रघतवान –निवृत्त अधिकारी, टीआरटीआय , मैत्रेयी कांबळे – राष्ट्रीय संयोजक, ऊखउउख नेक्स्टजेन तसेच रजत रघतवान – सीईओ, युनिव्हर्सल ट्राइब्स इत्यादी सर्व उपस्थित होते

# कला व कलाकार ही तर समाजाची ऊर्जास्थाने - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई/प्रतिनिधी

कला व कलाकार ही त्या त्या देशाची, समाजाची ऊर्जास्थाने असतात. ज्यामुळे लोकांमध्ये प्रबोधन आणि क्रांतीचे विचार रूजविले जातात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेश इंगोले यांनी केले. लोकनेते विलासराव देशमुख सभागृहात झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय व सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित वेव्ह २०२५ या कार्यक्रमांतर्गत आयोजित संगीत सोहळ्यात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्हणून अंबाजोगाईचे नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड यांच्यासह तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, अभय जोशी व भीमाशंकर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते कलादेवतेचे प्रतिमापूजन व दीप प्रज्ज्वलाने करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, भारत सरकार द्वारा आयोजित हा उपक्रम महाराष्ट्रामध्ये महायुती सरकार द्वारे प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. व महाराष्ट्रातील लोककलाकारांना एक सशक्त व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचे अभिनंदन केले. कलेचा वारसा हा ऐतिहासिक असतो आणि विविध कलाकार इतिहासामध्ये आपली नोंद कलेच्या माध्यमातून करतात आणि आजरा अमर होतात. कला ही त्या कलाकाराला माणूस म्हणून समृद्ध करत असते आणि त्यामुळे कलाकार हे आपल्या आयुष्यात सदैव समाधानी, सुखी आणि आनंदी असतात असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त करत असे सांस्कृतिक कार्यक्रम महाराष्ट्र सरकार तर्फे वारंवार अंबाजोगाई मध्ये घेण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना मिलिंद गायकवाड यांनी शासन हे महाराष्ट्रातील कला व कलाकार यांना जागतिक पातळीवर घेऊन जात आहे असे मत व्यक्त केले. यानंतर झालेल्या चर्चासत्रात निषाद म्युझिक कंपनीचे प्रकाश बोरगावकर यांनी संगीत ही मोठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ झालेली आहे आणि भारताकडे यासाठी लागणारी सर्व संसाधने आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय संगीताचा धबधबा आज ही कायम आहे. येथील तरूणांनी ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या जीवनाचे करिअर संगीत क्षेत्रात घडविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरूवात प्रख्यात शाहीर तुकाराम सुवर्णकार यांच्या ’जय जय महाराष्ट्र माझा’ या गाण्याने झाली. यावेळी २०२५ ची ध्वनिचित्रफीत सगळ्यांना दाखवून यावर चर्चासत्र संपन्न झाले. या कार्यक्रमात पोवाडा जागरण गोंधळ लोकगीते स्थानिक कलाकारांची चर्मवाद्यांवर जुगलबंदी महाराष्ट्र गीत स्थानिक लोककला लोकधारा शाहिरी गीते जनप्रबोधनपर गीते यांचे प्रभावी सादरीकरण झाले. यावेळी अनेक कलाकारांनी आपल्या गायन नृत्य गोंधळी कला यांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली.

## पान एक वरून

**राज्यात ६० हजार अनधिकृत**

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी यशवंतराव चव्हाण सभागृह येथे स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते त्या वेळी मंत्री सरनाईक बोलत होते. स्कूल बसमधून शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखावह झाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. परिवहन विभागानेही विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य दिले असून यासाठी स्कूल बसेसच्या नियमावलीत आवश्यक सुधारणा केल्या जातील. वाहनचालकांनी या नियमांचे काटेकोरपण पालन करावे, असा इशारा देतानाच नियमावलीत सुधारणा करताना वाहनचालक आणि पालक संघटनांच्या भावना आणि अडचणींचाही विचार केला जाईल. कोणावर अन्याय होणार नाही; पण नियमही शिथिल होणार नाहीत, असेही सरनाईक या वेळी म्हणाले.

**निकाल जाहीर,पडताळणी झाली पण**

परिषद भरती प्रक्रियेतील आरोग्य सेवक ५०% पुरूष उमेदवार असून आमचा निकाल २ ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर करण्यात आला, त्यानंतर ६ सप्टेंबर २०२४ रोजी एकूण १०४ पात्र उमेदवारांची कागदपत्र पडताळणी करण्यात आली, ही सर्व कार्यवाही पूर्ण होऊन आज ९ महिन्याचा प्रदिर्घ कालावधी उलटला असून बीड जिल्हा परिषदेने अद्याप अंतिम निवड यादी सुद्धा जाहीर केली नाही.महाराष्ट्रातील बहुतांश जिल्हा परिषदांनी आरोग्य सेवक ५०% पुरुष कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश दिलेले आहेत. मात्र बीड जिल्हा परिषदेच्या दिरंगाई मुळे आम्ही बऱ्याच दिवसापासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहोत. यामुळे आम्हला मानसिक ताण जाणवत असून अनेक उमेदवार नैराश्यात गेली आहेत. अनेक वेळा जिल्हा परिषदेला रितसर निवेदन, मेल, कॉल, मेसेज, करून ही जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने आम्हाला नियुक्ती देण्यास दिरंगाई करत आहे. दरम्यान जोपर्यंत आरोग्य सेवकांना नियुक्त्या दिल्या जात नाही तोपर्यंत आमरण उपोषण सोडले जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा आरोग्य सेवक ५० टक्के पुरुष उमेदवारांनी जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

**परळी–गंगाखेड महामार्ग**

पूर्ण करा किंवा जनआंदोलन उभारल्याशिवाय पर्याय नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी म्हटले आहे. यासंदर्भात त्यांनी मित्र मंडळाच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले होते या या निवेदनात त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु प्रशासनाकडून याची दखल घेण्यात आली आणि त्यांना बोलावून आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याची विनंती केली आणि संबंधित अधिकाऱ्यांची त्यांचे बोलणे करून दिले तसेच अधिकारीही बोलले विनंती की चार दिवसाच्या आत कामास सुरुवात करू असा शब्द त्यांनी दिला होता त्यामुळे त्यांनी प्रशासनाची विनंती मान्य केली व आंदोलन मागे घेतले परंतु कामास सुरुवात झाली नाही. गेल्या आठवड्यात त्या राष्ट्रीय महामार्गावर मोठा अपघात घडला आणि एकास आपले प्राण गमवावे लागले अजून किती जीव घेणार आहेत हे अधिकारी असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे म्हणून लोकांचे हाल होत आहेत तसेच प्रदूषणाचा, शारीरिक विकारांचा त्रास सामान्यांना भोगाव लागतो आहे याकडे प्रशासनाने लक्ष देऊन त्वरित रखडलेल्या कामास सुरुवात करावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

**पोहण्यास गेलेल्या मुलाचा**

नागापूर येथील वाण धरण परिसरात गेला. पाण्याचा अंदाज आला नाही .पाण्यात उतरलेल्या या मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परळी नगर परिषदेच्या आपत्ती विभागाचे प्रमुख सुनील आडोदे, गोविंद गित्ते, नितीन जगतकर, निखिल गोदाम, तेजस घुले, विठ्ठल गित्ते यांनी शोध कार्य सुरू करत अर्ध्या तासात बुडीत मयत मुलाला शोधून बाहेर काढले. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस पुढील तपास करीत आहेत.

**जातीनिहाय जनगणनेवर**

दादासाहेब मुंडे गणेश करांडे ,विष्णू मस्के, हरी सावंत ,फरहान शेख ,गवळी, रामहरी नागरगोजे ,पाशाभाई, अमजद कुरेशी ,अविनाश डरपे इत्यादी उपस्थित होते

**पिंपरी घाटमध्ये भोजनातून**

घेतली. अपघात विभागातील सीएमओ मारुती आंबाड, सर्व परिचारिका, कर्मचारी यांच्यासह राहुल (बाबा) गित्ते यांनी तातडीने रुग्णांना दाखल करून घेत उपचार सुरू केले. सध्या सर्व रुग्णांवर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, आमदार धनंजय मुंडे यांनी रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधून बाधितांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली आणि योग्य त्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

## पान सहा वरून

**आपले सरकार सेवा केंद्राचे**

नायब तहसिलदार सांगळे ,मंडळ अधिकारी पाचभाई, तहसिल कार्यालयाचे लिपीक गपाट व आपले सेवा केंद्राचे कर्मचारी सार्थक वाघ,हार्दिक कुचेकर, आशिष चाळक,सुरज वाघ व शहरातील नागरिकासह ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गोडाऊन किपरवर गुन्हा**

राजेंद्र उंडे, अनिल देशपांडे गोविंद फुणगे, श्रीकांत जाधव, ऋषी राऊत, आर आर जाधव, सतिष फुलसौंदर, बंडू म्हसे, अशोक मंडलीक, रियाज देशमुख, कर्णा जाधव, सुनिल रासने, समीर शेख, आकाश येवले, कृष्णा गायकवाड, सचिन पवार, राजेंद्र परदेशी, दिपक साळवे, दिपक मकासरे, महेश कासार,राजेंद्र पवार, प्रसाद मैड, अपना टिके, देवेंद्र शिंदे, श्रेयस लोळगे आदि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गायरान वन धारकांचे**

यावेळी मोठ्या संख्येने मोर्चात गायरान जमिन वन जमिन वहितीधारक सामिल झाले होते मोर्चा ला भाई बजरंगअण्णा ताटे, माया शिंदे,रामभाऊ लगाडे, हनुमंत पाटुळे यांनी संबोधित केले.यावेळी सुनिल गायकवाड, प्रभु ताटे, नवनाथ ताटे,सुमन काळे,आदि उपस्थित होते.

**कत्तलखान्यावर एलसीबीचा**

फिर्यादीवरून गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार ध्यानपाल लोखंडे हे करत आहेत.

**जनसेवेचे कर्तव्य प्रामाणिक**

अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी तर प्रस्ताविक अशोक करे यांनी केले. पांडुरंग झोडगे पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन देवदूत प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी संयोजनाची उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली.

**झेडपी शाळेत उन्हाळी**

खेडकर मॅडम, श्रीमती शिंदे मॅडम व कुमारी सारिका घोलप यांचे मोलाचे योगदान लाभत आहे. विद्यार्थ्यांचा या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग असून, त्यांचा आत्मविश्वास व अभ्यासातील रुची वाढताना दिसत आहे. शाळा प्रशासन व पालकवर्गाने या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हे प्रशिक्षण प्रभावी ठरत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## अवकाळीमुळे झाड कोसळून दुचाकीचे नुकसान

**कळवा :** कळवा खारेगाव येथे सकाळच्या सुमारास अचानक अवकाळी पाऊस सुरू झाल्याने खारेगाव पाखाडी नाक्यावर सुपर मार्केटजवळ पन्नास वर्षे जुने भले मोठे झाड कोसळून पडले. या झाडाखाली पार्क केलेल्या दुचाकींचे नुकसान झाले, तर झाडाची फांदी एका इमारतीच्या गॅलरीवर पडल्याने गॅलरीचा सज्जा मोडकळीस आला आहे, तर दुसऱ्या घटनेत खारेगाव दत्तवाडीमधील स्वामी समर्थ मठाजवळ ठाणे परिवहनच्या बस स्टॉपचे पत्रे उडाले आहेत. दोन्ही घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक उमेश पाटील यांनी भेट देऊन महापालिकेला माहिती दिली. आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी व अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत झाड कापून वेगळे केले.

### वेचक

## पाकिस्तानावरील एअर स्ट्राईकचा डोंबिवलीत जल्लोष

**कल्याण :** दहशतवाद्यांनी काश्मीरच्या पहलगाममध्ये केलेल्या हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्यानंतर बुधवार (दि. ७)रोजी भारतीय सैन्याने पाकिस्तानात घुसून एअर स्ट्राइकद्वारे मिसाईल हल्ला करत दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त केले. भारतीय सैन्याने दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतल्यानंतर शिवसेना डोंबिवली शहर शाखेत जल्लोष साजरा करण्यात आला. बुधवारी दुपारी शिवसेना शहर शाखेबाहेर आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूरचा जल्लोष करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात 'सिंदूर' हातात घेत, तिरंगा फडकवत कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी उत्साही कार्यकर्त्यांनी पाकिस्तानचे झेंडे फाडत पाकिस्तान मुर्दाबाद भारत जिंदाबाद यासारख्या घोषणा दिल्या. यावेळी आमदार राजेश मोरे यांच्या समवेत उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, डोंबिवली शहर सचिव तथा विधानसभा क्षेत्रप्रमुख संतोष चव्हाण, माजी स्थायी समिती सभापती जनार्दन म्हात्रे, डोंबिवली महिला शहर संघटक केतकी पोवार, कविता गावंड, युवासेना डोंबिवली शहर अध्यक्ष सागर जेधे, सागर दुबे, उपशहरप्रमुख गजानन व्यापारी, माजी नगरसेवक रंजीत जोशी, संजय पावशे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# ठाण्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची हजेरी

### काही भागांत झाडे उन्मळून पडली, वाहतूक व्यवस्था विस्कळीत

**ठाणे (प्रतिनिधी):**

गेल्या दोन दिवसांपासून ठाणे शहर आणि परिसरात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत नागरिकांना चांगलेच हैराण केले आहे. सोमवार आणि मंगळवारी दुपारनंतर अचानक काळे ढग दाटून आले आणि काही क्षणांतच वादळी वाऱ्यांसह पावसाने शहरावर धडक दिली. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट यामुळे वातावरणात भीती निर्माण झाली.

वादळी वाऱ्यांचा जोर अधिक असल्याने कोपरी, वागळे इस्टेट, दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह कळवा आदी भागात अनेक झाडांच्या फांद्या तुटल्या, तर काही झाडे रस्त्यांवर कोसळली. राबोडी परिसरात २५ फूट लांब आठ फूट उंच नाल्याची भिंत पडली. पावसामुळे वाहतूक व्यवस्थेला मोठा फटका बसला. शहरातील अनेक रस्त्यांवर वाहतूक मंदावली होती. सायंकाळच्या सुमारास ऑफिस सुटण्याच्या वेळी पावसाने पुन्हा एकदा जोर पकडल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली. अवघ्या ५ ते १० मिनिटे विजांचा कडकडाटांसह पावसाने दमदार हजेरी लावल्याने वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाला होता.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, अरबी समुद्रातून येणाऱ्या दमट वाऱ्यांमुळे वातावरणात आर्द्रता मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्याचा परिणाम म्हणून राज्यातील विविध भागांत अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. ठाणे आणि मुंबई परिसरात पुढील २४ ते ४८ तासांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

या अवकाळी पावसाचा फटका केवळ शहरापुरताच मर्यादित नाही, तर ग्रामीण भागात शेतकऱ्यांनाही याचा फटका बसण्याची शक्यता आहे. विशेषतः उन्हाळी पिकांवर पावसाचा परिणाम होऊन नुकसान होऊ शकते, अशी भीती कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. काही शेतकरी वर्गाने आपले पिके काढण्याच्या तयारीत असताना आलेल्या पावसामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.








१) ठाणे महापालिका आणि जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. झाडांखाली उभे राहणे, वीज पडण्याच्या ठिकाणी थांबणे किंवा पाण्याने भरलेल्या रस्त्यांवरून प्रवास करताना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
२) आपत्ती व्यवस्थापन विभाग सज्ज असून, कोणताही अनपेक्षित प्रकार घडल्यास नागरिकांनी तत्काळ महापालिकेच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### अनेक भागांतील रस्त्यांवर पाणी

या अवकाळी पावसामुळे अनेक भागांत झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. ठाणे शहरातील नाशिक महामार्ग, एक्स्प्रेस हायवे, घोडबंदर रोड, वर्तक नगर, लुईसवाडी, कोपरी, भिवंडी रोड आदी भागांत जोरदार सरी बरसल्या. काही ठिकाणी पावसाचा जोर इतका होता की, काही मिनिटांतच रस्त्यावर पाणी साचले.

### सेवा, शिस्तीसह उत्तरदायित्वावर भर

## केडीएमसी आयुक्तांचा रुक्मिणीबाई रुग्णालयात दौरा

**कल्याण (वार्ताहर) :**

कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी बुधवारी सकाळी ९.१५ वाजता कल्याण येथील महापालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयाला अचानक भेट दिली. रुग्णालयातील रुग्णालयांच्या चेअरवर बसून रुग्णांशी थेट संवाद साधत त्यांनी मिळणाऱ्या सेवा, औषधसाठा आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचा आढावा घेतला. दौऱ्यात आयुक्तांच्या निदर्शनास आले की, ओपीडीची ठरलेल्या वेळेत सुरु झालेली नव्हती. याबाबत त्यांनी कडक नाराजी व्यक्त करत स्पष्ट निर्देश दिले.

यामध्ये ओपीडी वेळापत्रक आयुक्तांच्या मंजुरीनंतर प्रसिद्ध करावे. सर्व डॉक्टरांनी विहीत वेळेच्या किमान ५ मिनिटे अगोदर ओपीडीमध्ये उपस्थित राहावे. डॉक्टर अनुपस्थित असल्याचे दिसून आले. याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. सर्व डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसार अदा करावे. फार्मासिस्ट अनुपस्थित होता याबाबत चौकशी करून अहवाल सादर करावा. औषध साठ्यावर संगणक प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवावे, औषधे उपलब्ध नसल्यास जबाबदारी निश्चित करावी. फार्मासिस्ट अनुभवी नसल्याची बाब निदर्शनास आणून नागरिकांना योग्य सेवा मिळावी म्हणून अनुभवी कर्मचारी नियुक्त करावेत.

डॉक्टर, कर्मचारी वेळेत उपस्थित राहण्यासाठी आदेश निर्गमित करावेत; साप्ताहिक अचानक तपासणी करून अहवाल सादर करावा. स्त्रीरोग तज्ज्ञांची ओपीडी सेवा त्वरित सुरू करावी. प्रसूती सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवा करावी. सुविधा अधिक दर्जेद व्हाव्यात, रुग्णांशी सौजन्यपूर्ण वर्त करावे. रुग्णालय बाहेरील कचरा बॅनर तत्काळ हटवावे. रुग्णवाहि दुरुस्त करून देखभाल नियमि करावी. वाहनचालक सेवा टाळल्या कारवाईचे प्रस्ताव सादर करावे शिस्त, पारदर्शकता आणि दर्जेद रुग्णसेवा हीच प्राथमिकता असा पाहिजे. असे महापालिका आयुक्तां रुग्णालय व्यवस्थापनाला बजावले.



> आयुक्त अचानक रुक्मिणीबाई रुग्णालयात आले होते. रुग्णसेवा, वैद्यकीय साधनांची माहिती त्यांनी घेतली. दर्जेदार रुग्णसेवा देण्याबाबत, रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय सुविधा तत्परतेने उपलब्ध करून घेण्याच्या सूचना केल्या. आयुक्तांच्या सूचनेप्रमाणे रुग्णालयात रुग्णसेवेविषयी आवश्यक बदल केले जातील.
>
> **- डॉ. संदीप पगारे,** प्रभारी मुख्य वैद्यकीय अधिकारी, रुक्मिणीबाई रुग्णालय

> पालिका रुग्णालयात रुग्णांना गुणवत्तापूर्ण तत्पर सेवा मिळाली पाहिजे. या कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई प्रस्तावित केली जाईल.
>
> **- अभिनव गोयल,** आयुक्त

## वावेघर आदिवासी पाड्यात जीवनावश्यक वस्तूंची मदत

**कल्याण (वार्ताहर) :**

स्वामी समर्थ सेवा केंद्र, वावेघर, वाडा, जिल्हा पालघर येथे स्वामी समर्थ केंद्र, पारनाका श्री गणेश भक्ती मंडळ आणि पारनाका शिवजयंती उत्सव यांच्या वतीने स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टसाठी, त्या भागातील आदिवासी पाड्यातील लोकांना, जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, कपडे, रोख रक्कम तसेच वापरलेले चांगले कपडे यासाठी लोकांकडे मागणी करून आवाहन केले. तसेच आदिवासी पाड्यातील १२ आदिवासी सामूहिक विवाहासाठी आणि त्यानिमित्त येणाऱ्या वऱ्हाड्यांना सामूहिक भोजन व्यवस्थेसाठी लागणारे शिधा सामान, तसेच काही नवीन कपडे यासाठी आवाहन केले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून कमी कालावधीत लोकांनी दोन टेम्पो भरून अन्नधान्य, कपडे, महागड्या साड्या देऊ केले. पारनाका गणेश मंदिरासमोर हा कार्यक्रम संपन्न झाला. कमलाकर पाटील हे चालवत असलेल्या संस्थेसाठी शिवसेना उप शहरप्रमुख, शिवजयंती उत्सव संयोजक दिनेश शेटे, राजेश देसाई, अरुण जोशी, संजय शिर्के, शेखर पातकर, कोष्टी, चावरे, तुषार केळकर यांनी मोलाची कामगिरी बजावली. दिनेश शेटे यांच्या पुढाकाराने हब कार्यक्रम संपन्न झाला. इनरव्हील क्लबने दि. १३ रोजी होणाऱ्या सामूहिक विवाहासाठी वस्तुरुप भरपूर मदत केली.



## भाईंदरमध्ये वादळी वाऱ्याचा स्मशानभूमीला तडाखा

**भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदरमध्ये मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास सोसाट्याचा वादळी वारा आल्याने मोठ्या प्रमाणात हवेत उडालेल्या धुळीमुळे लोकांची दाणादाण उडाली. त्यातच भाईंदर पश्चिम येथील स्मशानभूमीत सीएनजी दाहिनीची चिमनी आणि रेल्वे स्थानकाजवळ मोठे झाड कोसळून खाली पडल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

मीरा-भाईंदरमध्ये मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास सोसाट्याचा वादळी वारा आणि त्यानंतर जोरदार पाऊस सुरू झाल्याने नागरिकांचे जनजीवन अस्ताव्यस्त झाले. महापालिकेच्या भाईंदर पश्चिम येथील स्मशानभूमीतील सीएनजी दाहिनीची चिमनी वादळी वाऱ्यामुळे कोसळून खाली पडली. अन्य चिमन्या देखील वादळी वाऱ्याने डुलत असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने आजूबाजूच्या घरांवर किंवा रस्त्यावर चिमनी पडली नसल्याने मोठी जीवित हानी टळली. तसेच भाईंदर पश्चिमेच्या रेल्वे स्थानकावरील स्कायवॉक जवळ एक मोठे झाड रस्त्यावर पडले. यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. रात्री कामावरून घरी जाणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल झाले. रिक्षा व खाजगी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. नागरिकांचे जनजीवन अस्ताव्यस्त झाले होते. परिसरातील नागरिकांनी आणि महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटना स्थळी येऊन झाड बाजूला करत रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.



## कल्याण पूर्वेत रिक्षावर झाड पडून तिघांचा मृत्यू

### रिक्षाचालकासह दोन प्रवाशांचा समावेश

**कल्याण (वार्ताहर) :**

अचानक सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे भलेमोठे झाड चालत्या रिक्षावर पडून तिघांचा मृत्यू झाल्याची घटना कल्याण पूर्वेत घडली आहे. यामध्ये रिक्षाचालकासह दोन प्रवाशांचा समावेश असून त्यामध्ये एक महिला प्रवासी असल्याची माहिती केडीएमसीचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी दिली आहे.

कल्याण पूर्व रेल्वे स्थानकाकडून मंगळवारी (दि. ६) रोजी रात्री प्रवासी घेऊन एक रिक्षा चालक चिंचपाडा भागात चालला होता. याचवेळी अचानक तुफान वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू झाला. या वाऱ्याच्या वेगाने चिंचपाडा भागातील रस्त्याच्या कडेला असलेले एक गुलमोहराचे झाड तेथून जात असलेल्या रिक्षेवर अचानक कोसळले. झाडाचा बुंधा, फांद्या रिक्षेच्या छतावर अचानक मोठ्या झटक्याने कोसळल्याने रिक्षेचा सांगाड्यासह आतील प्रवासी झाडाच्या माऱ्याने दबले गेले. अचानक रिक्षेवर कोसळलेल्या झाडाने तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. एक जण गंभीर जखमी झाला आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच आमदार सुलभा गायकवाड यांनी देखील तातडीने अग्निशमन विभाग, पोलीस प्रशासन यांच्याशी संपर्क साधत मदतकार्य सुरू केले.

अग्निशमन दलाने अथक प्रयत्न करून या रिक्षातील तिघा जखमींना रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र उपचार करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिल्याचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी सांगितले. यामध्ये रिक्षाचालकासह दोन प्रवाशांचा समावेश असून त्यामध्ये एक महि प्रवासी आहे. उमाशंकर वर्मा (व ५२), लता दत्ताराम राऊत (व ४७), तुकाराम शामराव खेंग (वय ४५) अशी या मृतां नावे आहेत.

या दुर्दैवी प्रसंगी केडीएम आयुक्त अभिनव गोयल, पोली उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्य आयुक्त कल्याणजी घेटे, विधानस निवडणूक प्रमुख संजय मो शिवसेना शहर प्रमुख निलेश शिं प्रशांत काळे, कोळसेवाडी पोली ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गणे न्हायदे व अग्निशमन अधिका घटनास्थळी उपस्थित होते.



## लोक अदालतीतून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची वीज ग्राहकांना संधी

**कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण परिमंडलातील कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित करण्यात आलेले ग्राहक तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (दि. १० मे) रोजी आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कल्याण परिमंडल कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुका न्यायालयात दि. १० मे रोजी सकाळी ११ ते दुपारी दोन दरम्यान राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. परिमंडलातील सुमारे १ लाख ५८ हजार ९३९ ग्राहकांना २८१ कोटी रुपयांच्या थकीत वसुलीसाठी लोक अदालतीत सहभागी होण्याबाबत विधी विभागाकडून नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. यात कल्याण मंडल एकमधील ९ हजार ५००, कल्याण मंडल दोनमधील ६७ हजार ८३८, वसई मंडलातील ६१ हजार १२८ आणि पालघर मंडल कार्यालयांतर्गत २० हजार ४७३ प्रकरणांचा समावेश आहे.

नोटिस मिळाली नसेल तरीही या ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होत आपल्या प्रकरणांचा निपटारा करून घेता येणार आहे. संबंधित ग्राहकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील तालुका न्यायालयात आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## सुकलेल्या धोकादायक झाडाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील आग्रा रोड पेट्रोल पंपासमोर ज्ञानेश्वर मंदिराच्या बाजूला झाड पूर्णपणे सुकलेले असून वारा आल्यानंतर कधीही पडू शकते, अशा धोकादायक स्थितीत आहे. केडीएमसी वृक्ष प्राधिकरण विभागाला या सुकलेल्या धोकादायक झाडांबाबत तक्रार करून देखील दुर्लक्ष होत आहे. मंगळवारी अवकाळी पाऊस सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कल्याण पूर्वेत रिक्षावर झाड पडल्याने तीन जणांचा दुर्दैवी मुत्यू झाल्याची घटना घडली. यातून प्रशासनाने बोध घेत संदर्भीत धोकादायक सुकलेल्या झाडांना काढणे देखील गरजेचे आहे.

या धोकादायक सुकलेल्या झाडा संदर्भात माजी नगरसेवक मोहन उगले यांनी प्रसिद्धी माध्यमांच्या निर्देशनास आणून देत, उपआयुक्त, मुख्य उघान अधिक्षक, संजय जाधव यांना तक्रार दिली असून वारंवार पाठपुरावा करून देखील संदर्भित धोकादायक, सुकलेल्या झाडांचा प्रश्न मार्गी लागत नसल्याची सांगितले जात आहे.



## ग्रामीण भागात पावसाचा फटका

### आंब्यांच्या बागेसह, वीट भट्टीचे नुकसान

**मुरबाड (वार्ताहर) :**

तालुक्यात ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात मंगळवारी रात्री पावणेदहा वाजता सुमारास जोरदार वादळी वाऱ्यासह मेघ गर्जना झाल्याने पावसामुळे वीटभट्टीचे नुकसान झाल्याची माहिती वीट भट्टीचे मालक दीपक धुमाळ यांनी दिली. या वादळी वाऱ्यामुळे जवळपास सतरा तास बत्ती गुल झाल्याने उकाड्याचा नागरिकांना सामना करावा लागला. बुधवारी ग्रामीण भागात व शहरी भागात वीज पुरवठा खंडीत झाल्याने छोट्या-मोठ्या उद्योग व्यवसायावर परिणाम झाला. वादळी वाऱ्यासह पाऊस बरसल्याने ठिकठिकाणी विद्युत तारा तुटल्या. तालुक्यातील आदिवासी पट्ट्यात तसेच ग्रामीण भागात पावसाचा जोरदार तडाखा बसला.



## कल्याणमध्ये 'ऑपरेशन अभ्यास' मॉक ड्रील यशस्वी

**डोंबिवली :** केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्यासाठी "ऑपरेशन अभ्यास" या मॉक ड्रिलचे आयोजन कल्याण पश्चिमेतील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणावर करण्यात आले. केंद्रीय गृह विभागाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून यशस्वीरीत्या ही मॉक ड्रील पार पडली. यावेळी जिल्हा प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कल्याण तहसीलदार, नागरी संरक्षण दल, केडीएमसी आयुक्त, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, पोलीस यंत्रणांचे अधिकारी, आमदार उपस्थित होते.

## दुरुस्तीच्या कामासाठी २४ तास पाणीपुरवठा बंद



**भाईंदर :** मीरा -भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण आणि महाराष्ट् औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाण पुरवठा करण्यात येतो. जांभुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील अत्यंत महत्वाच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी २४ तासांचा शटडाऊ घेतला जाणार आहे. त्यासाठी गुरुवार ८ मे रोजी रात्री १२ ते शुक्रवार ९ म रोजी रात्री १२ वाजेपर्यंत असा एकूण २४ तास मीरा-भाईंदर शहरास महाराष् औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणा आहे. तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्ववत होईपर्यंत मीरा-भाईंदर शहरास पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिराने होईल. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महापालिकेस सहकार्य करावे असे कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभागाचे कार्यकारी अभियंता शरद नानेगांवकर यांनी आवाहन केले आहे.

### नगरपालिकेतर्फे शहरातील नागरिकांना आवाहन

# मुख्य रस्ते, फुटपाथवरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे हटवा

**अंबरनाथ (प्रतिनिधी):**

अंबरनाथ पूर्व व पश्चिम शहरातील मुख्य तीन रस्ते फायर ब्रिगेट कार्यालय ते कोहोजगाव चौक, बी. केबीन रोड ते मोरीवली पाडा तसेच मटका चौक ते फॉरेस्ट नाका या मुख्य रस्त्यावरती असलेले अतिक्रमण अनधिकृत बांधकाम व हातगाड्या तसेच फुटपाथवर असलेले अतिक्रमणे काढल्या बाबतचे आदेश मुख्याधिकारी उमाकांत गायाकवाड यांनी आढावा मिटिंगमध्ये देण्यात आले होते. मुख्याधिकाऱ्यांच्या आदेशाने गेल्या



रस्त्यावरती असलेले अतिक्रमणे पोलिस बंदोबस्तासह अतिक्रमण विभागाचे प्रमुख नरेंद्र संख्ये, सुनील गावीत सर्व कर्मचारी वर्ग, आरोग्य विभाग व कार्यालयातील अधिकारी वर्ग सर्व मिळून बुधवार दि. ७ मे २०२५ रोजी कल्याण बदलापूर येथील कार्यवाही करून केलेले निष्काशित केले आहे. बुधवार रोजी तिन्ही रस्ते मोकळे करण्यात आले. महत्त्वाचा रस्ता फायर बिग्रेट ते कोहोजगाव तेथील फायर बिग्रेटची गाडी जाण्यासाठी अनेक वर्षापासून या रस्त्यावर अतिक्रमणे काढली जात नव्हती; परंतु तो ही रस्ता संपूर्ण मोकळा करण्यात आला आहे. याबाबत शहरातील पूर्व व पश्चिम येथील सर्व नागरीकांनी या मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड व अतिक्रमण विभागाचे प्रमुख नरेंद्र संख्ये यांचे विशेष कौतुक केले आहे.

अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम अतिक्रमणास नोटीस बजावून कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ठिकाणी पुन्हा अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकाम केल्यास त्यावर नगरपालिका अधिनियमानुसार कार्यवाही करुन गुन्हा दाखल करण्यात येईल. शहरातील सर्व नागरिकांना व व्यापारी वर्गाला आव्हान करण्यात येते की शहरातील मुख्य रस्ते जेथे आहेत तेथे कुठल्याही फुटपाथवरती अतिक्रमण करु नये. जेणेकरून नागरीकांना येण्या-जाण्यास अडथळा निर्माण होणार नाही असे आवाहन नगरपालिकेतर्फे शहरातील

छाया : अशोक घाग



भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या ९ ठिकाणांवर एअर स्ट्राईक करत दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर दिल्याने ठाण्यात शिवसेनेच्या वतीने जल्लोष करत पाकिस्तानचा झेंडा जाळला. खासदार नरेश म्हस्के, शिवसेना शहरप्रमुख हेमंत पवार आदींसह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते.

# 'ऑपरेशन सिंदूर'; पिक्चर अभी बाकी है...

काश्मीरमध्ये पहलगाम येथे निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या ज्या २६ पर्यटकांना दहशतवाद्यांनी त्यांचा धर्म विचारून थेट गोळ्या घातल्या. त्याचा बदला भारतीय सैन्य दलाने 'ऑपरेशन सिंदूर'चा जबरदस्त प्रहार करून घेतला. दि. २२ एप्रिलच्या पहलगाम हत्याकांडाने सर्व देशाला हादरा बसला. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने तब्बल पंधरा दिवसांनी पाकिस्तानमध्ये घुसून पाकिस्तान व पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील सात शहरांतील नऊ दहशतवादी तळ अवघ्या पंचवीस मिनिटांत उद्ध्वस्त केले. ६ आणि ७ मेच्या मध्यरात्रीनंतर भारतीय हवाई दलाने दहशतवाद्यांच्या तळांवर हल्ले केले. क्षेपणास्त्रांनीही अचूक वेध घेतला आणि पाकिस्तानची दाणादाण उडाली. भारतीय सैन्यदलाकडून हल्ला होणार याची पूर्ण कल्पना पाकिस्तानला होती. भारत कसा व केव्हा हल्ला करणार, हल्ल्याचे टार्गेट काय असणार याबद्दल भारताने शेवटपर्यंत गुप्तता पाळली होती, पण ७ मे रोजी भल्या सकाळी भारतीय विमानांच्या पाकिस्तानवरील हल्ल्याची दृश्ये टीव्हीच्या पडद्यावर दिसू लागली तेव्हा देशात आनंदाची लाट उसळली. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून दहशतवाद्यांचे नऊ मोठे तळ नेस्तनाबूत केल्याचे बघून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र जनतेने सैन्यदलाचा जयजयकार केला. सोशल मीडियावर तर भारत माता की जय, मोदीजींचे अभिनंदन अशा पोस्टचा वर्षाव होत होता. मोदींसारखे कणखर नेतृत्व देशाला लाभले म्हणूनच भारत पाकिस्तानला धडा शिकवू शकला अशी भावना देशभर निर्माण झाली. जे लोकांना पाहिजे तेच मोदी करून दाखवतील असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटले होते. पहलगाम हत्याकांडातील दहशतवाद्यांना 'चुन चुन कर मार देंगे' असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले होते. पहलगामची घटना घडल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतले. ते काश्मीरला गेले नाहीत म्हणून विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी त्यांच्यावर टीकाही केली. पण बिहारमध्ये मधुबनी येथे बोलताना मोदी म्हणाले, 'दहशतवाद्यांनी कल्पनाही केली नसेल अशी त्यांना कठोर शिक्षा मिळेल'. मोदींनी देशाला दिलेला शब्द खरा करून दाखवला. जो कोणी हिंदूना टार्गेट करील त्याची अवस्था काय होईल हे 'ऑपरेशन सिंदूर' ने सर्व जगाला दाखवून दिले.

भारताने पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दशतवाद्यांचे नऊ तळ हे आपले टार्गेट ठरवले होते. पाकव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथील लष्कराच्या प्रशिक्षण केंद्राला लक्ष्य केले. सोनमर्ग, गुलमर्ग व पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांनी येथे प्रशिक्षण घेतले. कोटली, भिंबर, सियालकोट, मुरीदके, भवालपूर येथे जिथे-जिथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते तेथे भारतीय हवाई दलाने हल्ले करून ती केंद्रे बेचिराख करून टाकली. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये २४ क्षेपणास्त्रे डागली. हे तर होणारच होते हे सर्व जगाला ठाऊक होते. देशाचे नेतृत्व मोदींकडे असताना पहलगाम हत्याकांडानंतर भारत शांत बसणार नाही हे जगाने ओळखले होते. पुलवामा हत्याकांड झाल्यानंतर भारताने सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला धडा शिकवला होता पण त्यानंतरही पाकिस्तानने भारतावर दहशतवादी हल्ले चालूच ठेवले होते. म्हणूनच पाकिस्तानला जरब बसेल अशी अद्दल घडवणे जरूरीचे होते. भारतीय सेना दल व हवाई दल यांनी 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम संयुक्तपणे राबवली. भारतीय हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंह व लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी या दोन महिला अधिकाऱ्यांनी नवी दिल्लीत संयुक्त पत्रकार परिषद घेऊन 'ऑपरेशन सिंदूर'ची तपशीलवार माहिती जगाला दिली. जैश ए मोहमंद या दहशतवादी संघटनेचा प्रमुख मसुद अजहरच्या कुटुंबातील दहा जणांचा व त्याच्या निकटचे असलेल्या चार जणांचा भारतीय हवाई हल्ल्यात मृत्यू झाला याची कबुली त्याने स्वतःच दिली आहे. भारताच्या मोस्ट वॉन्टेड मसुद अजहरच्या कुटुंबातील मरण पावलेल्या त्या सर्वांच्या नावांची यादीही जाहीर झाली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' राबवताना सर्वसामान्य नागरीकांना कोणतीही इजा होणार नाही याची काळजी भारतीय सैन्याने घेतली होती. तसेच भारताने पाकिस्तानी सैन्य केंद्रावर कुठेही हल्ला केला नाही. दहशतवाद्यांचे तळ हेच 'ऑपरेशन सिंदूर'चे टार्गेट होते. नऊ ठिकाणी केलेल्या हल्ल्यात शंभरपेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले असल्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे लढाऊ विमान पाडण्यातही भारतीय हवाई दलाला यश मिळाले आहे. जैशच्या किमान ४५ दहशतवाद्यांचा खात्मा झाला असावा असा अंदाज आहे. पाकिस्तानातील चार व पाकव्याप्त काश्मीरमधील पाच अशा नऊ तळावर भारताने हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानमधे नऊ दहशतवादी केंद्रे भुईसपाट केल्यावरही भारताची तीन विमाने पाडल्याचा प्रचार पाकिस्तान मीडियावरून चालू आहे. पण तसे कोणतेही पुरावे पाकिस्तानला जगापुढे मांडता आलेले नाहीत. पाकिस्तामधील दहशतवादी केंद्रांवर भारताने केलेल्या हल्ल्याला 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव स्वतः मोदींनी दिले होते. ऑपरेशन सिंदूरचा आराखडा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी तयार केला असला तरी त्यावर पूर्ण देखरेख मोदींची होती. महिलांना त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या पतींना गोळ्या घालून दहशतवाद्यांनी ठार मारले असे भयानक हत्याकांड यापूर्वी कधी झाले नव्हते. मुंबईवर २६/११ ला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात दोनशे नागरीकांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर पहलगाम येथे दहशतवाद्यांनी नागरीकांवर केलेला हा मोठा हल्ला होता. पहलगाम हल्ल्यात महिलांसमोर त्याच्या पतीला कंठस्नान घातले होते. दहशतवाद्यांनी महिलांचे कुंकू पुसले. म्हणूनच 'ऑपरेशन सिंदूर'ने त्या विधवा महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्या महिलांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने उरी, पठाणकोट, पुलवामा, पहलगाम याचा बदला घेतला आहे, पण ही लढाई संपलेली नाही. निवृत्त लष्कर प्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या भाषेत सांगायचे तर, 'ऑपरेशन सिंदूर' ही भारताच्या कारवाईची फक्त एक झलक आहे, पिक्चर अभी बाकी है...!

# पहलगामचा बदला




पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला करून काश्मीर आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला ठेच पोहोचवण्याबरोबरच भारतात हिंदू-मुस्लीम दंगे घडवण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न होता; परंतु शत्रूविरुद्ध लढताना आम्ही १०५ ही भारताची परंपरा पाकिस्तानच्या लक्षात आली नाही. गेल्या १५ दिवसांत भारताने पाकिस्तानची आर्थिक कोंडी करण्याबरोबरच आता दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करून पाकला धडा शिकवला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला कठोर कारवाईचे आश्वासन दिले होते. दहशतवाद्यांची उरलेली जमीन जमीनदोस्त केली जाईल, असा इशारा देताना त्यांनी त्यासाठी भारतीय सुरक्षा दलांना पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. एकीकडे जगाला विश्वासात घेत असताना जनतेचा युद्ध सराव होण्याअगोदरच पाकिस्तानला बेसावध ठेवून भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानचे कंबरडे मोडून काढले आहे. 'मॉक ड्रिल' केल्यानंतर चार-पाच दिवसांत भारत हल्ला करील, असा पाकिस्तानचा अंदाज होता; परंतु गनिमीकाव्यात असा चकवा द्यावा लागतो. तो भारताने दाखवून दिले आहे.

मंगळवारी मध्यरात्रीनंतर पावणेदोन वाजता सुरक्षा दलांनी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील ९ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला केला. या हल्ल्यांमध्ये शंभरहून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. मुरिदकेमध्ये ३० दहशतवादी मारले गेले. इतर छावण्यांमध्येही अनेक दहशतवादी मारले गेले आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारतीय सैन्याने पाकिस्तानात लपलेल्या नऊ दहशतवादी अड्ड्यांवर क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यात अनेक दहशतवादी मारले. हा हल्ला 'लश्कर-ए-तोयबा' आणि 'जैश-ए-मोहम्मद'च्या लपण्याच्या ठिकाणांवर करण्यात आला आहे. याशिवाय, भारतीय लष्कराने भारतीय सीमेत घुसण्याचा प्रयत्न करणारे एक पाकिस्तानी लढाऊ विमान पाडले आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. अशा परिस्थितीत, 'ऑपरेशन सिंदूर'ची योजना कशी आखण्यात आली हे समजावून घेणे आवश्यक आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर लगेचच 'ऑपरेशन सिंदूर'चे नियोजन सुरू करण्यात आले होते. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक बोलावण्यात आली होती. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याकडे या संपूर्ण मोहिमेचे नेतृत्व होते. ते सतत हवाई दल, नौदल आणि लष्कराच्या संपर्कात होते. पहलगाम हल्ल्यानंतर मोदी यांनी गुप्तचर संस्था आणि 'एनटीआरओ'सह पाकिस्तानमधील उच्च दर्जाच्या दहशतवादी तळांची ओळख पटवण्याची जबाबदारी डोवाल यांना दिली होती. पाकिस्तानमधील अशा दहशतवादी छावण्या निवडण्याची जबाबदारी डोवाल यांच्यावर सोपवण्यात आली होती. डोवाल यांनी 'ऑपरेशन सिंदूर'साठी एक छोटी टीम तयार केली होती. त्यात तिन्ही सैन्यातील निवडक अधिकाऱ्यांचा समावेश होता आणि त्यांच्या समन्वयाने ऑपरेशन सुरू करण्यात आले. पाकिस्तानमध्ये अशा ठिकाणी कारवाई करण्याची योजना होती, जिथे दहशतवादाला फटका बसेल. यानंतर, जेव्हा डोवाल यांनी पंतप्रधान मोदींसमोर या नियोजनाचा आराखडा सादर केला, तेव्हा त्यांनी या योजनेला मान्यता दिली. या काळात मोदी आणि अजित डोवाल यांच्यात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. हल्ल्यादरम्यानही हे दोघेही ऑपरेशनवर लक्ष ठेवून होते.

**प्रा. विजयकुमार पोटे**

पाकिस्तानी भूमीवर मध्यरात्री घुसून भारताच्या बलाढ्य सैन्याने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये राफेलने आकाशातून हॅमर आणि क्रूझ क्षेपणास्त्रांचा वर्षाव केला. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय सैन्याने दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. या ऑपरेशन अंतर्गत, सैन्याने प्रथमच राफेलसारख्या लढाऊ विमानासह आत्मघाती ड्रोन आणि लोटेरिंग दारूगोळा वापरला. या कारवाईत भारतीय सैन्याने अत्याधुनिक शस्त्रे वापरली. त्यामुळे ही कारवाई धोरणात्मक आणि तांत्रिक दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरली. फ्रान्सकडून खरेदी केलेल्या राफेल विमानांचे हे पहिले प्रत्यक्ष ऑपरेशन होते. या विमानांचा अतिवेग, लांब पल्ल्यावरील अचूक लक्षभेद करण्याची क्षमता आणि प्रगत एव्हियोनिक्समुळे दहशतवादी लक्ष्यांवर अचूक हल्ला करणे शक्य झाले. राफेल विमानातून डागण्यात आलेले स्कॅल्प क्षेपणास्त्र २५० किलोमीटर अंतरावरील लक्ष्यांवर अचूकपणे मारा करू शकते. पाकिस्तानमधील दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यासाठी याचा वापर करण्यात आला. 'लश्कर'चा बालेकिल्ला असलेल्या 'मरकज-ए-तोयबा'लाही उडवून देण्यात आले. मुंबईवर हल्ला करण्यापूर्वी २६/११ च्या दहशतवाद्यांनी प्रशिक्षण घेतले होते, तिथे हॅमर बॉम्ब टाकण्यात आला. त्यासाठी राफेलचा वापर करण्यात आला. 'हायली ॲजाइल मॉड्यूलर म्युनिशन एक्सटेंडेड रेंज' हा एक स्मार्ट बॉम्ब आहे. तो कठीण प्रदेशात असलेल्या लक्ष्यांना अचूकतेने नष्ट करण्यास सक्षम आहे. हे बॉम्ब दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर टाकण्यात आले. भारतीय सैन्याने प्रथमच 'लोइटरिंग म्युनिशन्स'चा वापर केला. ते आत्मघाती ड्रोन आहेत. हे ड्रोन लक्ष्यावर घिरट्या घालतात आणि योग्य वेळी हल्ला करतात. त्यामुळे अचूकता वाढते आणि संपार्श्विक नुकसान कमी होते. भारतीय हवाई दलाने 'स्टँड-ऑफ' शस्त्रे वापरली. त्यामुळे शत्रूच्या हद्दीत प्रवेश न करताही विमानांना दूरवरून हल्ले करण्याची क्षमता मिळाली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानमधील पाच आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या चार अड्ड्यांवर हल्ला करण्यात आला. पाकिस्तानमधील बहावलपूर, मुझफ्फराबाद, कोटली, गुलपूर, चक अमरू, भिंबर, सियालकोट, बाग आणि मुरिदके येथील दहशतवादी तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत. याशिवाय मुरिदके येथील 'लश्कर-ए-तोयबा'चे प्रशिक्षण शिबीर, 'मरकज-ए-तोयबा' आणि बहावलपूरमधील 'जैश-ए-मोहम्मद'चा बालेकिल्ला 'जैश-ए-सुभानल्ला'लाही लक्ष्य करण्यात आले. 'मरकज-ए-तोयबा' त २६/११ च्या दहशतवाद्यांनी प्रशिक्षण घेतले होते. त्यांचे हे लपण्याचे ठिकाण पूर्णपणे नष्ट झाले आहे.

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानचा तिळपापड झाला आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी प्रत्युत्तर देण्याची भाषा केली आहे. भार ही कारवाई अमेरिका, रशियासह जगातील अन्य प्र देशांना विश्वासात घेऊन केल्याचे अमेरिकेचे अ डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानावरून ध्वनित ह भारताविरुद्ध दहशतवादी हल्ले करण्याचा कट जि आखला, तिथेच हा हल्ला केला. सामान्य जनतेला त्य त्रास होणार नाही, याची दक्षता भारताने घेतली. भारता या कृतीची पाकिस्तानला काहीच कल्पना नव पाकिस्तान कोणतीही कारवाई करण्यापूर्वीच भार काम पूर्ण केले. भारताची कारवाई पूर्णपणे यशस्वी झा 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने कोणत्याही पाकिस् लष्करी तळाला लक्ष्य केले नाही. लक्ष्यांची निवड अ त्यांची अंमलबजावणी करण्याच्या पद्धतीमध्ये भार बराच संयम दाखवला आहे. असे करून भारताने ए एकदा पाकिस्तानला आरसा दाखवला आहे. भारता 'ऑपरेशन सिंदूर'चे पडसाद अमेरिकेत पोहोचले अ अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही यावर प्रति दिली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारताने के पाकिस्तानलाच आश्चर्यचकित केले नाही, तर जगाल आश्चर्याचा धक्का दिला.

सीमा न ओलांडताही भारत कारवाई करू शक हे पाकिस्तानला दाखवून दिले; शिवाय पाकिस्तान संभाव्य कृतीलाही हाणून पाडले. पाकिस्तानचे जेएफ- पाडण्यात आले. भारताच्या आकाश क्षेपणास्त्र प्रणा हे विमान पाडले. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अ अचूकतेने पार पाडले. यामध्ये भारतीय लष्कर, नौ आणि हवाई दलाच्या अचूक शस्त्रांचा वापर करण आला. लष्कराने कामिकाझे ड्रोनचाही वापर के कामिकाझे ड्रोनला 'लोइटरिंग म्युनिशन'असेही म्हणत ही अशी शस्त्रे आहेत, जी त्यांच्या लक्ष्यांशी थेट टक देऊन त्यांचा नाश करतात. त्यात वॉरहेड असते. त्या त्याचा स्फोट होतो.

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकव् काश्मीरची राजधानी मुझफ्फराबादमध्ये अंधार पसर स्फोटांनंतर शहरातील वीजपुरवठा पूर्णपणे खं झाला होता. त्यानंतर पाकिस्तानने सीमेवर गोळी केला. भारताने यावर जोरदार प्रत्युत्तर दिले. 'ऑपरे सिंदूर'च्या माध्यमातून भारताने पाकिस्तानची दहशत संघटना 'जैश-ए-मोहम्मद'ला मोठा धक्का दिला अ भारतीय विमानांच्या गर्जनेत, 'जैश-ए-मोहम्मद'चा उद्ध्वस्त करण्यात आला. स्फोटांच्या आवाजाने स परिसर हादरला. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'ला प्रत् म्हणून पाकिस्तानी सैन्याने गोळीबार केला. या नियंत्रण रेषेवरील आणि जम्मू आणि काश्मीरच्या समो आंतरराष्ट्रीय सीमेवरील चौक्यांवरून तोफांचा करण्यात आला. या अंदाधुंद गोळीबारात तीन नि नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. पाकिस्तान या कारवाईला योग्य प्रत्युत्तर देण्याचा इशारा भार दिला आहे.

# कोकणचा रानमेवा हरवतोय...!

कोकणात आंबा, फणस, कोकम, जांभुळ, करवंद असं सर्वकाही आहे. यामुळेच कोकणात एप्रिल, मे महिन्यात उष्णता वाढलेली असते. वातावरणात उष्णता असतानाही कोकणवासीय शहरातील चाकरमानी तर गावाकडे येतातच; परंतु कोकणात उष्णता असतानाही देशभरातील पर्यटक कोकणात येतात. कोकणातील समुद्रकिनारे कोकणातील खाद्यसंस्कृती, पर्यटनस्थळ, मंदिर या सर्वांच आकर्षण पर्यटकांना आहे आणि याबरोबरच कोकणचा रानमेवा हे देखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. गेल्याकाही वर्षात हवामानात सतत बदल घडत आहेत. या हवामानातील बदलाचा परिणाम कृषी क्षेत्रातील सर्वच घटकांवर होत आहे. यावर्षी वारंवार येणाऱ्या अवकाळी पावसाने आणि वाढलेल्या उष्णतेने कोकणातील आंबा, काजू, कोकम, जांभुळ, करवंद अशा सर्वच फळपिकांवर याचा परिणाम जाणवू लागला आहे. आंबा, काजू, मासे यावर कोकणचे अर्थकारण अवलंबून आहे. त्याची होणारी आर्थिक उलाढाल मोठी होईल तेव्हा फळबागायतदाराच्या हातात पैसा येईल; परंतु हवामानाच्या अनियमिततेमुळे सारेच गणित बिघडून जाते.



आंबा, काजू या फळावर तर हवामानाचा फार मोठा परिणाम होतो. काजू 'बी'चा यावर्षीचा दर सर्वसाधारणपणे स्थिर होता. थोडाफार त्यात बदल होत राहिला; परंतु आंब्याच्या दरात घसरण होत राहिली. मध्येच उष्णता वाढल्याने काजू, आंबा ही फळ लवकर तयार झाली. पाऊस पडल्याने या फळांवर काळे डागही पडले. सहाजिकच ही डागी फळ म्हणून त्याला दरही कमी मिळाला. त्याचबरोबर झाडावर आंबे अलिकडे कुठे दिसतही नाहीत. रायवळ आंबा पूर्वी कोकणात विपुल प्रमाणात होता. पूर्वीच्या कोकणातील पिढ्या या रायवळ आंबा, फणस, जांभुळ यावरच जगल्या आहेत. सर्वसाधारणपणे जानेवारी ते जून अशा सहा महिन्यात कोकणात तयार होणारी फळ कुटुंबांचा उदरनिर्वाह सांभाळत होती. फणस तयार झाले की फणसाची कुवरीची भाजी, कच्चा फणस त्याची भाजी, फणसाचे गरे, जांभुळ, करवंद असं सार पौष्टिक नैसर्गिक खाद्य कोकणात होत. कोकणात गावो-गावी गरीबीच होती. दोनवेळच जेवण मिळण मुश्किल होत. हातात पैसा नव्हता परंतु कोकणातील रानमेव्याची अफाट श्रीमंती होती. या श्रीमंतीनेच कोकणातील शेतकऱ्याला, सर्वसामान्य माणसांना फार मोठा आधार दिला आहे. पावसाळी हंगामातही कोकणातील शेतकरी रानभाज्यांवर गुजरान करायचा. या खाण्यामध्ये कोणतीही भेसळ नव्हती. जे काही खायच ते शंभर टक्के निसर्गाने दिलेलं त्यावर पोसलेल खाद्य होत. रायवळ आंबा आणि हा रायवळ आंबा खाण्यातली मजा काही औरच होती. रायवळ आंबा त्याची चव थोडासा मिरमिरीतपणा तो खाताना तो चोखून खावा लागतो. खाताना त्याचा रस हातावर ओघळत येणार ठरलेलच. जर हाताच्या कोपरापर्यंत रायवळ आंब्याचा रस ओघळत आला नाही तर त्याची मजाच येणार नाही. दुसऱ्यांच्या शेतातील आंब्याच्या झाडावर दगड मारून पाडलेला आंबा जेव्हा आपण खातो तेव्हा एक आंबा पाडण्याचा जो भीम पराक्रम आपण करतो तो अविर्भाव काही औरच असतो.



## माझे कोकण

**संतोष वायंगणकर**

शेतात फिरणे, आंबे पाडणे हे सार आज पन्नाशी, साठी पार केलेल्यांनी अनुभवल आहे. रायवळ कच्चा आंबा त्याला मालवणीत तोर म्हणतात. या आंब्याला तिखट मिठ लावून खाण म्हणजे स्वर्ग सुखच म्हणावं लागेल. हेळू, आटक, निव, करवंद, जांभुळ हे तर कॉमनच आहेत. काटेरी झाडावरची करवंद काढणं हे देखील जिकरीचे काम. डोंगरातील ही काळी मैना रानात पूर्वी अनेक ठिकाणी पहावयास मिळायची. या करवंदांच्या जाळीवर शालेय जीवनात अनेकजण तुटून पडायचे. काटेरी जाळीतील करवंद काढतानाही आज आणि तेव्हाही चांगलीच कसरत होत असते. परंतु डोंगरातली ही काळी मैना एकदा खायला सुरूवात केली की ती आणखीन खावीशी वाटतात; परंतु अलीकडे अनेक भागातील करवंदाच्या जाळी नविन बदलामध्ये कुठे दिसत नाहीत. करवंदांच्या जाळीखाली बहुतांशवेळा आपणाला मातीची पेडं दिसते. त्या वारूळात सापाच वास्तव्य असत असही बऱ्याचवेळा म्हटलं जातं. मग त्याच्याही फार चवीने रंगवलेल्या कहाण्या वर्षानुवर्षे कोकणातील गावो-गावी ऐकायला मिळतील. जाळीत करंदा काढूक गेलय आणि सापाने फना कशी काढल्याना ती फना बघून करंदाचो खोलो (पानाच्या) टाकून कसे पळालव या सुरस कथा अनेक गावातून चर्चिल्या जातात. कोकणातील ग्रामीण भागातील हॉटेलात चहा-भजी खाताना या सगळ्या गजालीत कोकणी माणूस रमलेला असतो. कोकणातील जांभुळ देखील प्रसिद्ध आहेच. मधुमेहींसाठी जांभुळ या फळाने विशेष करून गेल्याकाही वर्षात मान मिळवला आहे. सोन्याच्या भावात जाऊन मान मिळवला आहे. जांभुळ देखील अलिकडे फारच कमी प्रमाणात उत्पादित होत आहे. कोकणातील जांभुळ त्याच्या बिया औषधी म्हणून वापरतात. एकेकाळी ज्या जांभळाला फारस कोणी विचारत नव्हत. आज त्याच जांभळाच्या झाडांवरील जांभळाचा लिलाव होतो. इतक महत्त्व आलय. पिकही फार कमी येत त्यामुळे या जांभळाच दर्शनही कोकणातील स्थानिक बाजारपेठांमधून होताना दिसत नाही. पूर्वी टोपलीभर जांभळ बाजारात विक्रिला यायची; परंतु आज-काल दररोज जांभुळ मुंबई, पुणे, नागपूरच्या बाजारात जातात. मुंबईतील दादर मार्केटमध्ये महाराष्ट्रातील इतर भागातून आणि इतर राज्यातूनही जांभुळ येतात; परंतु पहिला मान आणि मागणी कोकणातील जांभुळालाच आहे.

रतांबाही अलीकडे फारच कमी होत चाललाय. या रतांब्याला यावर्षी प्रचंड मागणी आणि चांगला दरही आहे. परंतु रतांब्याची नव्याने फार लागवड होत नाही. रतांब्याची लागवड फार कीरकोळ प्रमाणात झाली आहे. रतांब्याचा उपयोग औषधांपासून रंगापर्यंत सर्वच बाबतीत होत आहे. त्याला चांगला दरही आहे. पूर्वी ज्या रतांब्याला दोन-तीन रुपये किलोने कोणी विचारत नव्हते. तोच रतांबा यावर्षी अडीचशे-तिनशे रूपये किलोने विकला जातोय. कोकणातील आंबा, काजूच जस नवनवीन संशोधन झालय तसच कोकणातील हा सारा रानमेवा आपण जपला पाहिजे. यातच कोकणपण टिकून राहू शकेल. रानमेवा हरवता कामा नये. खरी ती देखील कोकणची ओळख त्याची स्वादिष्टता आपले वेगळेपण सिद्ध करणारी आहे.

## राशिभविष्य

गुरुवार, ८ मे २०२५

**॥ पंचांग ॥**

आज मिती वैशाख शुद्ध एकादशी श १९४७. चंद्र नक्षत्र उत्तरा फाल्गुनी. हर्षण,चंद्र राशी कन्या, भारतीय सौर १८, वैशाख शके १९४७ म्हणजेच गुरुवार दिनांक ८ मे, २०२५. मुंबई सूर्योदय ६.०७, मुंबईचा सूर्यास्त ७. मुंबईचा चंद्रोदय ३.३९ मुंबईचा चंद्रा ३.४९, उद्याची राहू काळ २.१२ ते ३.४९, मोहिनी एकादशी, रविंद्रनाथ टागोर जयंती, जागतिक रेडक्रॉस दि शुभ दिवस-दुपारी १२.२९ नंतर

**॥ भविष्य ॥**

**मेष** : आरोग्य चांगले राहील.

**वृषभ** : काही कामानिमित्त प्रवास करावा लागेल.

**मिथुन** : अनावश्यक खर्च टाळलेले

**कर्क** : नोकरी व्यवसायात अनुकूल घटना घडतील.

**सिंह** : पैशाचा ओघ चांगला राहील भाग्याची उत्तम साथ राहील.

**कन्या** : आपले मत इतरांना पटवून देण्यात यशस्वी व्हाल.

**तूळ** : काही वेळेस महत्त्वाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

**वृश्चिक** : प्रवासात सावध राहा.

**धनू** : कामात यश मिळेल.

**मकर** : कुटुंबात शुभवार्ता येतील.

**कुंभ** : कोणाच्याही आग्रहाला बळी पडू नका.

**मीन** : धनलाभाच्या दृष्टीने अनुकूल दिवस आहे.

जनसंवाद

### दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे एकीकडे सरकारने देशभरात युद्धसरावाचे आदेश दिले असताना आणि नागरिक त्यादृष्टीने मानसिक तयारी करत असताना 'ऑपरेशन सिंदुर' मोहिमेंतर्गत भारतीय सैन्य दलाने पाकव्याप्त काश्मिरमधील एकूण ९ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला करून दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले आहेत. भूदल, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे राबवलेल्या या मोहिमेत ६२ दहशतवाद्यांना कंठस्नान घातले गेल्याची माहिती पुढे येत आहे. २०१६ मध्ये केलेला सर्जिकल स्ट्राईक आणि २०१८ मध्ये केलेला बालाकोट एअरस्ट्राईक या नंतर भारताने पाकिस्तानच्या भूमीवर केलेली ही तिसरी लष्करी कारवाई आहे. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला दोन आठवडे उलटल्यानंतरही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये एक प्रकारची अस्वस्थता पसरली होती. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे ही अस्वस्थता काही प्रमाणात दूर झाली असून पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या बदल्याची ही सुरुवात मानली जात आहे. भारतीय सैन्य दलाच्या 'ऑपरेशन सिंदूर'ने 'दहशतवाद्यांना मुळासकट उखडून टाकू' असा संदेश पाकिस्तानलाच नव्हे तर संपूर्ण जगाला दिला आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही

पाकिस्तानशी सामने नकोच! अशाप्रकारचे वक्तव्य भारताचा प्रशिक्षक गौतम गंभीर याने केले आहे. भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीर याने, पाकिस्तानी संघाबरोबर क्रिकेट न खेळण्याचे जे वैयक्तिक मत अथवा जी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे, ती योग्यच आहे. याचे कारण काही दिवसांपूर्वीच पहेलगाम येथे, पाकिस्तानी अतिरेक्यांनी, भारतीय पर्यटकांवर त्याचा धर्म विचारून, भ्याड हल्ला केला होता. याचा निषेध करावा तेवढा थोडाच आहे. पाकिस्तानच्या या आततायी कृतीला, प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकचे पाणी तोडले. त्यांच्या आयातीवर बंदी घातली. अशा रीतीने नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही,म्हणतात ते खरे. याबाबतीत खुद्द बाळासाहेब ठाकरे यांनी मत व्यक्त केले होते की, पाकिस्तानी कारवाया जोपर्यंत थांबत नाहीत, तोपर्यंत पाकिस्तानबरोबर क्रिकेट सुद्धा खेळणे नको. हे नुकत्याच. पहलगाम येथील हल्ल्यावरून दिसून आले. त्यात पाकिस्तानला अधूनमधून भारतावर हल्ले करण्याची खुमखुमी येतच असते. पाकिस्तानच्या या उफराट्या कृतीवरून असेच म्हणावेसे वाटते कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी, वाकडे ते वाकडेच.

**- गुरुनाथ वसंत मराठे,** बोरिवली

### चोख प्रत्युत्तर

'ऑपरेशन सिंदूर' हे पहलगाममध्ये झालेल्या आपल्या निष्पाप बांधवांच्या क्रुर हत्येला भारताने पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले आहे. भारताने पाकिस्तानचे अतिरेकी तळ नष्ट केल्याने जगातून या कारवाईला पाठींबा मिळत आहे. दहशतवाद्यांना भारतात येण्यापासून रोखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. जगातल्या अतिरेक्यांना व जिहादींना आपला विचार बदलायला लावणारी ही कारवाई भारताने केली आहे. जगातील सर्व देश भारताच्या सोबत उभे असल्याने पाकिस्तान पाठिंब्यासाठी धडपडत आहे. पाकिस्तानवर या कारवाईचा काहीच परिणाम झाला नाही तर पुढच्या कारवाईला सामोरे जाण्यास तयार रहावे.

**- विवेक तवटे,** कळवा

### योग्य माहिती समोर आणणे महत्वाचे

"ऑपरेशन सिंदूर" या अत्यंत महत्त्वाच्या लष्करी कारवाईबाबत घेतलेली संयुक्त पत्रकार परिषद ही देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसेच माहितीच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल ठरली आहे. या परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री, हवाई दलातील अधिकारी व्योमिका सिंग आणि लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी उपस्थित राहून जनतेसमोर अधिकृत माहिती मांडली. हे तिघेही आपल्या क्षेत्रातील अत्यंत अनुभवी अधिकारी असून, त्यांनी संयमित आणि स्पष्ट भाषेत ऑपरेशनच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल माहिती दिली. अशा संवेदनशील घडामोडींच्या वेळी सरकार आणि लष्कराकडून थेट संवाद साधणं हे लोकशाहीचं बलस्थान आहे. जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी ही पत्रकार परिषद महत्त्वाची ठरली.

**- दीपक काशिराम गुंडये,** वरळी

### भारताचे चोख प्रतिउत्तर...

'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला चोख प्रतिउत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १५० कोटी भारतीय भारतीय सैन्यदलापुढे नतमस्तक आहेत. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत त्यांच्या घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने या मोहिमेद्वारे पाकिस्तानला दिला आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्यदलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले. २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक, लष्करी मदत करणे चालूच ठेवले त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. ऑपरेशन सिंदूर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

**- श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे

### पाकला कायमची अद्दल घडवणार!

पहलगाम येथील २६ निष्पाप पर्यटकांना करणाऱ्या अतिरेक्यांच्या हल्ल्यास चोख प्रत् म्हणून भारतीय हवाई दलाने अतिरेक्यां नऊ अड्ड्यांवर केलेल्या हल्ल्याचे त भारतीयांनी अभिमानाने ऊर भरणारे स्वा केले आहे. भिकेचे डोहाळे लागल्यामुळे स मदतीसाठी लाचार होऊन हात पसर पाकिस्तान देशोधडीला लागलेला अस देखील भारताची कुरापत काढत रा आहे. २६/११चा दहशतवादी हल्ल्यात १ पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू, १४. २. २ चा पुलवामा येथे सैनिकांच्या ताफ्याव हल्ल्यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला अस भारताने प्रत्येकवेळी सामंजस्याची भूमि किती काळापर्यंत घ्यायची याला मर्यादा आ पाकिस्तानच्या लष्कराला हात न लावता ने अतिरेकींचे तळ तेव्हढे टिपण्याच्या भार लष्कराच्या अचूकतेला जगाने दाद दिली अ चीनच्या भरवंशावर पाकने भारतावर आक्र करण्याची आगळीक केलीच तर भारताची पु कारवाई अधिक आक्रमक असेल.

**- कुमार मेस्त्री,** म

# बीडमध्ये बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना

प्रतिष्ठापना

## गौतम बुद्धांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक निघणार

### समाजबांधवांनी उपस्थित रहावे: पप्पु कागदे



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साठी धर्मातरांची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही ही घोषणा केरून १४ आक्टोबर १९५६ साठी नागपूर मुकामी तथागताच्या बुद्ध धम्माची दिक्षा घेऊन सारा भारत बौद्धमय करण्याचा संकल्प केला होता.

तथागताच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी तथागताच्या सम्यक सम्बुद्ध जयंतीचे औचित्य साधून रविवार दि.११ मार्च २०२५ रोजी सकाळी ठिक ८:३० वाजता बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भिमराज नगरपर्यंत काढण्यात येऊन बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा भिमराजनगर (राजुरीवेस) बीड येथील बुद्ध विहारात करण्यात येणार आहे. बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणाच्या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुज्य भिक्खू धम्मशिल थेरो (शिवणी) हे उपस्थित राहणार असून प्रमुख धम्मदेशनासाठी पुज्य डॉ. भिक्खु इन्दवंन्स महाथेरो (कुशीनगर) पुज्य भिक्खू चंद्रमुनी (हिंगोली) पुज्य भिक्खू धम्मघोष (हिंगोली) पुज्य भिक्खु पय्यावर्धन (हिंगोली) उपस्थित राहणार आहेत.

रविवार दि ९ मे २०२५ रोजी सकाळी ठिक ८:३० वाजता छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भिमराजनगर (राजुरीवेस) पर्यंत काढण्यात येणाऱ्या बुद्ध मूर्तीच्या भव्य मिरवणूकीस व बुद्धमूर्तीच्या प्रतिष्ठापणाच्या कार्यक्रमास समाज बांधवांनी उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमांचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, रमेश गंगाधरे,राजू जोगदंड, किसन तांगडे यांनी केले आहे.

# आपले सरकार सेवा केंद्राचे उदघाटन

कार्यक्रम:संजय पाटीलांच्या हस्ते उदघाटन



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:शहरातील आपले सरकार सेवा केंद्राचे संजय पाटील उपविभागीय अधिकारी व तहसिलदार हेमंत ढोकले व शहरातील नागरीक उपस्थित होते. मागील १५ वर्षांपासुन कार्यरत असलेले आपले सरकार सेवा केंद्र महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या योजनेचा लाभ जनते पर्यंत आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत देत आहे. शासनाच्या विविध ऑनलाईन योजना आपले सरकार मार्फत दिल्या जातात. सदर योजना देवून उत्कृष्ट काम करीत असल्यामुळे कळंब तालुक्यातुन प्रथम आपले सरकार सेवा केंद्र म्हणून निवड करण्यात आली आहे या वेळी आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक .डी.एस. वाघ पान २ वर

# सामाजिक बांधिलकीतुन मूल्य संवर्धित

ऋणानुबंध:अभिनेत्री प्राची सोनवणेचा कौतुकास्पद उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:स्वर्गीय अनिकेत सोनवणे याचा पाचव्या पुण्यस्मरणार्थ बालग्राम अनाथालय आश्रम येथे सोनवणे परिवाराकडून विद्यार्थ्यांना अन्नधान्य व खाऊचे वाटप करून करण्यात आला. अन्नदान हेच श्रेष्ठ दान हीच संकल्पना मनात ठेवून अभिनेत्री प्राची सोनवणे हिने आपला मोठा भाऊ स्वर्गीय अनिकेत सोनवणे याच्या पाचव्या पुण्यस्मरणार्थ दि ६ मे.मंगळवार रोजी बालग्राम सहारा अनाथालय आश्रम येथे अन्नधान्य व खाऊचे वाटप करून पुण्यस्मरणाचा कार्यक्रम करण्यात आला.

आम्ही आमच्या भावाच्या पुण्यस्मरणार्थ विविध सामाजिक उपक्रम राबवत असतो. या पार्श्वभूमीवर याही वर्षी आम्ही विविध कार्यक्रम न घेता अन्नदान करूनच अनाथ आश्रम येथील चिमुकल्यांना खाऊ व अन्नदानचे वाटप केले असल्याची माहिती रुचीका सोनवणे, अनिल सोनवणे यांनी दिली.त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असुन अभिनेत्री प्राची सोनवणे यांच्या परिवाराचे कौतुक होत आहे. गेवराई तालुक्यातील बालग्राम सहारा अनाथालय आश्रम येथे या कार्यक्रमासाठी पत्रकार बाळासाहेब आडागळे, उषा सोनवणे, संतोष गर्जे, यासह आश्रमातील सर्व कर्मचारी ,चिमुकले विद्यार्थिनी विद्यार्थी उपस्थित होते.

# भगवानराव सुतार यांचे निधन

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई:येथील सामाजिक कार्यकर्ते ड. सुनिल सुतार यांचे वडील भगवानराव लक्ष्मण ( बापु ) सुतार यांचे मंगळवार ता. ६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. बुधवार ता. ७ रोजी सकाळी दहा वाजता मांगीरबाबा स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजबांधव उपस्थित होते. त्यांच्या पश्चात ज्येष्ठ बंधु तथा समाजाचे नेते रामभाऊ सुतार, बहिनी, तीन मुले, मुलगी,जावई,सुना, पूतने,पूतनी नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# गोडाऊन किपरवर गुन्हा दाखल करा

निवेदन:पत्रकारांना अरेरावी, गैरवर्तनाचा निषेध

पुण्यभूमी प्रतिनिधी



राहुरी:येथील दोन पत्रकार बातमी घेत असताना गोडाऊन किपर शिंदे नामक व्यक्तीने एक पत्रकार शूटिंग घेत असताना मोबाईल हिसकावुन घेतला. तसेच अरेरावी व दमदाटी करुन बातमी घेण्यास मज्जाव केला. या बाबत संबंधित गोडाऊन किपरवर दोन दिवसांत कारवाई करण्यात यावी. अन्यथा तहसील कार्यालया समोर तालुक्यातील समस्त पत्रकारांच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पत्रकारांच्या वतीने देण्यात आला

राहुरी येथील तहसील कार्यालयाच्या आवारातील गोडाऊन जवळ दि. २ मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजे दरम्यान पुरवठा विभागातील धान्याचा काळाबाजार होत असल्याची माहिती मिळाल्याने पत्रकार मनोज साळवे व अनिल कोळसे हे त्या ठिकाणी बातमी घेण्यासाठी गेले. त्यावेळी पत्रकार मनोज साळवे हे मोबाईलवर शूटिंग घेत असताना तेथे गोडाऊन किपर शिंदे नामक व्यक्ती आला व त्याने पत्रकार मनोज साळवे यांच्या हाथातून मोबाईल हिसकावुन घेतला. आणि तुम्ही शूटिंग कशी काय घेता, शूटिंग घेण्यासाठी माझी लेखी परवानगी घेतली का? असे म्हणुन त्याने पत्रकारांना बातमी घेण्यास मज्जाव केला.

या घटने बाबत राहुरी तालुक्यातील समस्त पत्रकारांनी एकत्र येऊन तहसीलदार नामदेव पाटील यांना निवेदन दिले. गोडाऊन किपर शिंदे याच्यावर कायदेशीर कारवाई करावी, त्याचे निलंबन करुन खातेनिहाय चौकशी करावी, दोन दिवसांत कारवाई न झाल्यास समस्त पत्रकारांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी पत्रकारांच्या वतीने देण्यात आला. दिलेल्या निवेदनावर मनोज साळवे, अनिल कोळसे, विलास कुलकर्णी, निसारभाई सय्यद, संजय कुलकर्णी, वसंतराव झावरे, राजेंद्र वाडेकर, गणेश विघे, सुनील भूजाडी, रफिकभाई शेख, अनिल जाधव, विनित धसाळ, मिनाष पटेकर, शरद पाचारणे, आप्पासाहेब मकासरे पान २ वर

# स्ट्रीट लाईट कामाची चौकशी करा!

जोशना सरदार:लोणार नगर परिषद अंतर्गतचा प्रश्न

पुण्यभूमी प्रतिनिधी



लोणार: येथील नगर परिषद अंतर्गत दलित वस्ती प्रभाग क्रमांक पाच व आठ मध्ये विद्युत विभागाअंतर्गत स्ट्रीट लाईट व हाय मस्टची कामे करण्यात आलेली आहेत. परंतु हे कामे करत असताना संबंधित ठेकेदाराने या लाईट चे पोल कमी वजनाचे व निकृष्ट दर्जाचे वापरलेले आहेत. तसेच स्ट्रीट लाईट उच्च दर्जाची नसून इस्टिमेट मध्ये दर्शविल्याप्रमाणे वापरण्यात आलेले नाहीत. स्ट्रीट लाईट चे लाईन केबल हे पोल पासून अंडरग्राउंड टाकलेले पाहिजे असताना काही ठिकाणी हे लाईन केबल वरतून टाकलेले आहेत . त्यामुळे पशुपक्षी व नागरिकांना यापासून शॉक लागूनधोका होऊ शकतो जीवित हानी सुद्धा होऊ शकते.अशी परिस्थिती या ठिकाणी दिसून येत आहे. सदर ठेकेदार एजन्सीने हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलेले दिसून येत आहे. सदर कामाची त्वरित उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी आणि संबंधित ठेकेदार एजन्सी व अधिकारी यांच्यावर चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे जोशना गुलाब सरदार पाणीपुरवठा विभाग सभापती नगरपरिषद लोणार तसेच आबेद खान मोमीन खान माजी नगरसेवक लोणार यांनी एका निवेदनाद्वारे मुख्याधिकारी नगरपरिषद लोणार यांना केलेली आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी बुलढाणा जिल्हाधिरी कार्यालय बुलढाणा तसेच पोलीस निरीक्षक बुलढाणा, ठाणेदार साहेब बुलढाणा शहर पोलीस स्टेशन, लोणार तहसीलदार कार्यालय लोणार, लोणार पोलीस स्टेशन ठाणेदार साहेब, तालुका पत्रकार संघ लोणार यांना सादर केलेले आहे. संबंधित ठेकेदार एजन्सी व अधिकारी यांच्यावर उच्चस्तरीय चौकशी करून दिनांक १७/ ५/२०२५ पर्यंत कार्यवाही न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या कार्यालयासमोर आम्ही दलित वस्ती मधील सर्व नागरिकांना सोबत घेऊन दिनांक १९/५/२०२५ पासूनआमरण उपोषण केल्या जाईल. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्व जबाबदारी ही या कार्यालयाची असेल असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे.

# गायरान वन धारकांचे आंदोलन

आक्रमक:कळंब तहसीलसमोर आंदोलन




पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तहसिल कार्यालयासमोर श्रमिक मानवाधिकार संघटनेचे अध्यक्ष भाई बजरंगअण्णा ताटे यांच्या नेतृत्वाखाली गायरान वन जमिन वहीतीधारकानी सत्याग्रह धरणे आंदोलन केले यावेळी मोठ्या संख्येने गायरान वन जमिन वहीतीधारक उपस्थित होते. महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ आणि इतर शासकीय नियमानुसार गायरान व वनजमिनींवरील वहिती करणारे यांची तपासणी करून गावनमुना १ ई ला नोंद घ्यावी तालुक्यातील गायरान व वनजमिन कब्जेवहिवाट करून दरवर्षी प्रमाणे नांगरणी केली आहे त्यांचे पंचनामे करून दंडात्मक कार्यवाही करावी सरकारी गायरान,वन जमिन वहिती करून उपजीविका भागवितात त्या पिकांचे राष्ट्रीय उत्पादन सातबारा स्तंभ ११ मध्ये राष्ट्रीय उत्पादनाची नोंद करावी अशा मागण्याचे निवेदन शासनाकडे देण्यात आले यावेळी कळंब तहसिल ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुढे विर सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चा तहसील कडे काढण्यात आला पान २ वर

# कत्तलखान्यावर एलसीबीचा छापा

कारवाई:४ गायीचे मुंडके, २७० किलो गोमांस जप्त

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:शहरातील कुरेशी मोहल्ला परिसरात सुरू असलेल्या कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. या कारवाई दरम्यान ५४ हजार रूपये किंमतीचे २७० किलो गोमांस, चार गाईंचे मुंडके व साधने जप्त करण्यात आली आहे. दि ७ मे बुधवारी सकाळी पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणी दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक केली आहे. गफ्फार इस्माईल कुरेशी (वय ४५ ) व समद अल्लावली कुरेशी (वय ३९, दोघे रा. कुरेशी मोहल्ला) अशी त्यांची नावे आहेत.

या बाबतीत सविस्तर माहिती अशी की, निकम गल्ली येथील कुरेशी मोहल्ला येथे काही इसम प्रतिबंधित गोवंशीय जातीची प्राणी कापून त्याची चोरटी मांस विक्री करण्याच्या उद्देशाने ते बाळगून आहेत अशी खात्रीलायक माहिती पोलिस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप यांना मिळाली होती. त्यांनी ही माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक यांना कळवली व त्वरित स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी कायदेशीर कारवाईच्या सूचना दिल्या. पोलिस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप, पोलीस हवालदार ठोंबरे, पोलीस हवालदार वाघ, पोलीस नाईक वाघमारे यांनी छापा टाकत काही व्यक्तींना जनावराची कत्तल करत असताना रंगेहाथ पकडले. दोघे पोलिसांच्या हाती लागली इतरांची माहिती मिळाली नाही. याबाबत पोलिस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप यांच्या पान २ वर

डॉ.ओमप्रकाश शेटे

## देवदूत प्रतिष्ठानकडून सत्कार

# जनसेवेचे कर्तव्य प्रामाणिक असावे

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिंद्रुड:भारतीय जनता पार्टीमध्ये अंत्योदयाला प्रथम प्राधान्य आहे. समाजातील शेवटच्या घटकाची उन्नती व प्रगती झाली पाहिजे. त्यामुळे जनसेवेसाठी कार्यकर्त्यांचे कर्तव्य हे प्रामाणिक आणि पारदर्शक असले पाहिजे असे मत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले. माजलगाव, वडवणी व धारूर तालुक्यातील नवनिर्वाचित भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने माजलगाव वडवणी व धारूर तालुक्यातील नवनिर्वाचित भाजपा पदाधिकाऱ्यांचा सत्कार आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते संपन्न झाला. दिंद्रुड येथे ओम 'साईशिल्प' निवासस्थान येथे पार पडलेल्या सत्कार कार्यक्रमास विविध गावचे सरपंच, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विनायक मामा रत्नपारखी (माजलगाव मंडळ प्रमुख),रूपालीताई कचरे (किटी आडगाव मंडळ प्रमुख) डॉ.अभिजीत सोळंके (पात्रुड मंडळ प्रमुख) वडवणी येथील सुखदेव मामा रेडे (वडवणी मंडळ प्रमुख) या नवनिर्वाचित भाजपा पदाधिकाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, पक्षाने जबाबदारी देणे हा कार्यकर्त्यासाठी सन्मान आहे, परंतु त्यासोबतच आपल्यावर तेवढीच जबाबदारी येते. पक्षाचे निष्ठेने काम करत असताना जनतेच्या सेवेसाठी आपले कर्तव्य हे नेहमीच प्रामाणिक आणि पारदर्शक असले पाहिजे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासोबतच केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच त्याबाबत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. शेटे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे मनोबल वाढले.

नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी सत्काराला उत्तर देताना आपण जनतेच्या सेवेस कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमात माजलगाव मतदार संघातील भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी, मान्यवर यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवदूत प्रतिष्ठानचे पान २ वर

# झेडपी शाळेत उन्हाळी प्रशिक्षण

शैक्षणिक:रोबोटिक प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना फायदा



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत झक्छ टेकनॉलॉब प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने उन्हाळी प्रशिक्षण कार्यशाळेला सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमात रोबोटिक शिक्षणासह इंग्रजी आणि गणित या विषयांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी विशेष मार्गदर्शन दिले जात आहे.

ही कार्यशाळा इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी असून, दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात येत आहेत.या प्रशिक्षणात मार्गदर्शक म्हणून श्रीमती ज्योती गायकवाड मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक श्री. बांगर सर, श्रीमती सुरेखा पान २ वर